| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक ३०२ वा | मंगळवार दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### सीआयडी सांगून लुटले

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सतिश विठ्ठल दंडनाईक, वय ६६ वर्षे, रा. पळसप ता. जि. धाराशिव हे दि.१२.०२.२०२६ रोजी स्कुटी वरुन पळसप येथुन तेर ढोकी मार्गे कोल्हेगाव येथे जात होते. दरम्यान तेरणा प्रकल्प सप्लायचे बिल्डींग जवळ पाठीमागून दोन अज्ञाम व्यक्तीने आवाज देवून गाडी थांबवून आम्ही सी.आय. डी. आहोत असे सांगुन फिर्यादी यांचे हातातील १४ ग्रॅम वजनाचे दोन सोन्याच्या आंगठ्या एकुण ७४,००० किंमतीच्या काढुन घेतल्या. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सतिश दंडनाईक यांनी दि.१३.०२.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे ढोकी येथे गुन्हा नोंदवला आहे.

### अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फत्तु रा. इटकळ ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.१२.०२.२०२६ रोजी इटकळ येथे हिना पान शॉप नावाचे टपरीमध्ये महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ गुटखा पान मसाला व तंबाखु जन्य पदार्थ असा एकुण एकुण ६,००६ किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला नळदर्ग पो. ठाचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### गोवंशीय जनावरांची कत्तल करणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत टेम्पो क्र एमएच ०४ ई.बी. ९९४९ अज्ञात चालकाने दि.०१२.०२.२०२६ रोजी पिंपरी शिवारामध्ये सिफा बोन मिल ॲन्ड फर्टीलायझर कंपनीचे आवारात गोवंशीय जातीचे जनावरे कापून त्यांचे शिर, पाय व इतर आवयावाची टॅम्पो मध्ये साठा करुन ठेवल्याचे एकुण ३०,००० किंमतीचे मुद्देमालासह धाराशिव ग्रामीण पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द कलम २७१ बीएनएस, ५(सी), ९(ए) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### वारंवार केला लैंगीक अत्याचार

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत एका गावातील २५ वर्षीय महिलास सन २०२२ पासून दि.०३.०२.२०२६ रोजी पर्यंत हिस एका गावातील ९ महिला व पुरुषांनी जबरदस्तीने अनैतिक व्यावसाय करण्यासाठी डांबुन ठेवुन ग्राहकाकडून पैसे घेवून नमुद पिडीतास भाग पाडले. त्यातील दोन तरुणांनी पिडीतेचे इच्छेविरुध्द वारंवार तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.१२.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## संपूर्णता अभियान २.० चा शुभारंभ

# 'आकांक्षित जिल्हा' ही ओळख पुसण्याचा संकल्प करू या –जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार



धाराशिव दि.१६ फेब्रुवारी (जिमाका) संपूर्णता अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याचा अर्थात संपूर्णता अभियान २.० चा शुभारंभ आज जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते साईन बोर्डचे अनावरण व दीपप्रज्वलन करून करण्यात आला.या अभियानाचा कालावधी २८ जानेवारी ते १४ एप्रिल २०२६ असा राहणार आहे. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश काळे,निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास) देवदत्त गिरी आदी उपस्थित होते.

याप्रसंगी जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार म्हणाले की,संपूर्णता अभियान २.० अंतर्गत सहा निर्देशांक शंभर टक्के संतृप्त करून यावेळी सुवर्ण पदक मिळविण्याचा निर्धार आहे.'आकांक्षित जिल्हा' ही धाराशिवची ओळख या अभियानाच्या माध्यमातून पुसून टाकायची असून त्यासाठी वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी ते तळागाळातील घटकांपर्यंत सर्वांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.जिल्ह्यातील ४४० ग्रामपंचायती टी.बी.मुक्त घोषित करण्यात आल्या असून संपूर्ण जिल्हा टी.बी.मुक्त करण्याचा संकल्प असल्याचे त्यांनी सांगितले.

निती आयोगाद्वारे जानेवारी २०१८ मध्ये सुरू करण्यात आलेला 'आकांक्षित जिल्हा कार्यक्रम' हा देशातील ११२ मागास जिल्ह्यांच्या जलद विकासासाठी राबविण्यात येणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. महाराष्ट्रातील धाराशिव,नंदूरबार, वाशिम आणि गडचिरोली या जिल्ह्यांचा त्यामध्ये समावेश आहे.आरोग्य,शिक्षण, कृषी आणि मूलभूत सुविधा या क्षेत्रांवर विशेष भर देत ४९ प्रमुख कामगिरी निर्देशांकांच्या आधारे जिल्ह्यांची प्रगती मोजली जाते.असे श्री.पुजार यावेळी म्हणाले.

संपूर्णता अभियान १.०हा टप्पा १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात आला होता. जिल्हास्तरावरील पाच आणि तालुकास्तरावरील सहा मुख्य निर्देशांक शंभर टक्के संतृप्त करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.या अभियानाचा शुभारंभ ४ जुलै २०२५ रोजी परंडा येथे झाला होता. त्या वेळी विविध महिला बचतगट व 'उमेद'च्या माध्यमातून खाद्यपदार्थ व विविध वस्तूंचे स्टॉल उभारण्यात आले होते.

पहिल्या टप्प्यात जिल्ह्यास रौप्य पदक तर तालुका कार्यक्रमांतर्गत परंडा तालुक्याला कांस्य पदक मिळाले.या यशात योगदान देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र व चषक देऊन जिल्हाधिकारी व मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

सन्मानित मान्यवरांमध्ये जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास,अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी विनय कुलकर्णी,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास) देवदत्त गिरी, महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी (परंडा) गणेश कुकडे,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या जिल्हा अभियान व्यवस्थापक श्रीमती वनिता डोंगरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक), परंडा तालुका कृषी अधिकारी नानासाहेब लांडगे,उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनंत कुंभार,परंडा गट विकास अधिकारी विनोद जाधव तसेच आरोग्य विभागातील डॉ. सुषमा सांजेकर, डॉ. रुपाली शिंदे,आरोग्य सेविका श्रीमती. आशा काळे,उपकेंद्र चिंचपूर बुद्रुक येथील आरोग्य सेवक संभाजी बडे,बिराप्पा कोटागोंडे,आशा गट प्रवर्तक,आशा स्वयंसेविका,अंगणवाडी मदतनीस, ग्रामसखी,कृषी सखी,प्रभाग संघ व्यवस्थापक,बँक सखी,आर्थिक साक्षरता सखी,प्रभाग समन्वयक आणि सहायक कृषी अधिकारी यांचा समावेश होता.

कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व गट विकास अधिकारी,कृषी अधिकारी,आरोग्य कर्मचारी,आशा स्वयंसेविका,मदतनीस व ग्रामसखी आदी मोठ्या संख्येने उपस्थित हो

# कला केंद्रात नृत्याचा आनंद लुटला, दारू प्यायले अन् परतताना मित्राचा निर्घृण खून

येरमाळा (जि. धाराशिव) : कळंब तालुक्यातील चोराखळी येथील 'महाकाली कला केंद्रा'तील कार्यक्रम पाहून परतत असताना, जुन्या वादाचा वचपा काढण्यासाठी पाच मित्रांनी मिळून आपल्याच एका सोबत्याचा निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेत केज तालुक्यातील साळेगाव येथील सतीश भागवत मुंडे (वय ३७) या तरुणाचा मृत्यू झाला असून, येरमाळा पोलिसांनी याप्रकरणी पाच संशयित मित्रांना बेड्या ठोकल्या आहेत. या घटनेमुळे महाकाली कला केंद्र पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मयत सतीश मुंडे हा आपल्या पाच मित्रांसह १२ फेब्रुवारीच्या रात्री साडेदहाच्या सुमारास चोराखळी येथील महाकाली कला केंद्रात नृत्य पाहण्यासाठी आला होता. मध्यरात्री एक वाजेपर्यंत सर्वांनी कार्यक्रम पाहिला. फिर्यादीनुसार, संशयित आरोपींनी सतीशला आधी दारू पाजली आणि त्यानंतर साळेगावकडे परतत असताना जुन्या वादाचा राग मनात धरून त्याला गाठले. चालत्या वाहनात किंवा वाटेत सतीशला लाथाबुक्क्यांनी पोटावर आणि छातीवर इतकी अमानुष मारहाण केली की, त्याचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी मयताचे वडील भागवत बळीराम मुंडे यांनी १५ फेब्रुवारीच्या रात्री दोन वाजण्याच्या सुमारास येरमाळा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी पाचजणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून येरमाळा पोलिसांनी तातडीने तपासचक्र फिरवून पाचही संशयितांना ताब्यात घेतले आहे. हा खून नेमका कोणत्या कारणावरून झाला? आणि मारहाण नेमकी कोठे करण्यात आली? याचा सखोल तपास पोलिस उपनिरीक्षक स्वप्निल भोजगुडे हे करत आहेत.

# सोलापूर–तुळजापूर–धाराशिव रेल्वेमार्गासाठी राज्य वाट्यातील १५० कोटी मंजूर



धाराशिव : नव्याने साकारल्या जात असलेल्या सोलापूर-तुळजापूर-धाराशिवरेल्वेमार्गासाठी राज्य शासनाने त्यांच्या वाट्यापैकी १५० कोटी रुपये वितरीत करण्यास मंजुरी दिली आहे. ६ फेब्रुवारी रोजी याबाबतचा शासन आदेशही निर्गमित करण्यात आला आहे. तुळजापूर तीर्थक्षेत्र रेल्वेने जोडण्याची मागणी मागील अनेक वर्षांपासून होत होती.

दरम्यानच्या काळात सर्वेक्षणही पूर्ण झाले. मात्र, उत्पन्नाच्या दृष्टीने नॉट फिजिबल असा शेरा मारून रेल्वेने हा मार्ग अडगळीत टाकला होता. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत हा विषय पुन्हा ऐरणीवर आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यावेळी हा मार्ग पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार २०१९ साली हा मार्ग पिंकबुकमध्ये आला. या मार्गाची त्यावेळची प्रकल्प किंमत ही ९०४ कोटी ९२ लाख रुपये इतकी होती. तत्कालीन महायुतीच्या राज्य सरकारने या प्रकल्पाचा ५० टक्के खर्च उचलण्यास संमती दर्शवली होती. त्यानुसार ४५२ कोटी ४६ लाख रुपयांचे दायित्व राज्य सरकारने स्वीकारले.

दरम्यान, आता या प्रकल्पाची किंमत वाढून तब्बल ३२९५ कोटी रुपये इतकी झाली आहे. रेल्वे मंत्रालयाने या सुधारित प्रकल्प किमतीस मान्यता देण्यासाठी राज्य सरकारकडे प्रस्ताव दिल्यानंतर राज्याने गतवर्षीच त्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार आता राज्य सरकारचे दायित्व १६४७ कोटींवर जाऊन पोहोचले आहे. यापैकी ४० कोटी रुपये यापूर्वीच वितरीत करण्यात आले आहेत. दरम्यान, काम गतीने पुढे सरकत असल्याने रेल्वेने १५० कोटी रुपयांची मागणी केली होती. त्यास शुक्रवारी मंजुरी देण्यात आली असून, लवकरच हा निधी वितरीत केला जाणार आहे.

# महिला जोपर्यंत वाईट प्रवृत्तीचा विरोध करणार नाहीत तोपर्यंत जिजाऊ व अहिल्याबाई होणार नाहीत- प्रा.डॉ.क्रांती मोरे



धाराशिव (जिमाका)- वाशी येथील अजिंक्य विद्या मंदिर परिसरात आयोजित ग्रंथोत्सव धाराशिव २०२५ च्या दुसऱ्या दिवशी साहित्यिक प्रा.डॉ.क्रांती मोरे यांनी प्रभावी विचार मांडले.महिला जोपर्यंत वाईट प्रवृत्तीचा विरोध करणार नाहीत, तोपर्यंत जिजाऊ व अहिल्याबाई होणार नाहीत, असे प्रतिपादन त्यांनी केले. अहिल्याबाई होळकर यांना त्यांच्या सासऱ्यांनी मल्हारराव होळकर यांनी सर्व प्रकारचे शिक्षण देऊन सतीप्रथेचा विरोध करत राज्यकारभाराची जबाबदारी दिली. त्या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडत त्यांनी तत्कालीन चालीरुढींना झुगारून प्रजेच्या हिताला प्राधान्य दिले आणि म्हणूनच त्या 'पुण्यश्लोक' ठरल्या, असे त्यांनी नमूद केले.

प्रा.मोरे पुढे म्हणाल्या की,अहिल्याबाईंनी मंदिरे,घाट,विहिरी उभारून धार्मिक व सामाजिक बांधिलकी जपली.त्या काळात ज्या घराण्यांतील महिलांनी क्रांतिकारी विचार स्वीकारले,त्यांनी समाजात ऐतिहासिक प्रगती साधली.महिलांनी केवळ आर्थिक नव्हे तर मानसिक सक्षमीकरण साधणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला 'वाघिणीचे दूध' म्हटले आहे.ते पिल्यावर अन्यायाविरुद्ध आवाज उठवल्याशिवाय राहवत नाही,असे सांगत त्यांनी महिलांना हक्कांसाठी सजग होण्याचे आवाहन केले.

त्यांनी महापुरुषांच्या आरत्या करण्याच्या प्रवृत्तीवरही टीका करत,छत्रपती शिवाजी महाराज,जिजाऊ यांसारख्या व्यक्तिमत्त्वांचे विचार आणि कार्य जपणे अधिक महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट केले.महापुरुषांना जाती-जातींत विभागून केवळ जयंती साजरी करण्यापेक्षा त्यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजपरिवर्तन घडवणे गरजेचे आहे.वैचारिक समाजाने पुढील पिढी सक्षम करण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक युवराज नळे होते.त्यांनी अहिल्याबाईंच्या कार्यकाळाला सुवर्णकाळ संबोधत मंदिर, घाट,विहिरी उभारणी,जल-पर्यावरण संवर्धन आणि सर्व घटकांना उद्योगक्षेत्रात संधी देऊन रोजगारनिर्मिती केल्याचे सांगितले.

महेश्वरी साडीच्या परंपरेचा उल्लेख करत त्यांनी त्यांच्या दूरदृष्टीची प्रशंसा केली. यावेळी व.ग.सुर्यवंशी यांनी स्त्री चळवळ बळकट करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साधना विश्वकर यांनी केले तर आभार जिल्हा ग्रंथालय अधिकारी हनुमान ढाकणे यांनी मानले. ग्रंथचालक, ग्रंथपाल,विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोलीस भरतीतील उमेदवारांसाठी खासदार व आमदारातर्फे निवासाची मोफत सोय

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव जिल्ह्यात सध्या पोलीस भरतीची प्रक्रिया सुरू असून, यासाठी जिल्ह्याच्या विविध भागांतून तसेच ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने तरुण-तरुणी शहरात येत आहेत. या उमेदवारांचीराहण्याची गैरसोय होऊ नये, या सामाजिक जाणिवेने खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर व आमदार कैलास पाटील यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने धाराशिव शहरात उमेदवारांच्या निवासाची मोफत व्यवस्था केली आहे.

शहरातील पवनराजे कॉम्प्लेक्सच्या मागे असलेल्या 'समर्थ मंगल कार्यालय' येथे ही सोय करण्यात आली असून, सुमारे ९१ उमेदवारांची एकाच वेळी राहण्याची उत्तम व्यवस्था येथे उपलब्ध केली आहे. पोलीस भरतीसाठी येणारा तरुण हा कष्टकरी आणि शेतकरी कुटुंबातील असतो. शहरात आल्यावर त्यांच्या निवासाचा प्रश्न निर्माण होऊ नये आणि त्यांनी केवळ आपल्या मैदानी चाचणीवर लक्ष केंद्रित करावे, या उद्देशाने आम्ही ही छोटीशी सेवा उपलब्ध करून दिली आहे.

# कळंब तालुक्यात 'लाडकी बहीण' योजनेचा लाभ रखडला; हजारो महिलांमध्ये संताप !

कळंब (प्रतिनिधी)- राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी महाराष्ट्र शासनच्या 'लाडकी बहीण' योजनेचा लाभ तालुक्यातील अनेक महिलांना अद्याप मिळालेला नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ई-केवायसी प्रक्रिया अपूर्ण राहणे, तांत्रिक अडचणी आणि कागदपत्रांतील त्रुटी यामुळे हजारो लाभार्थी गेल्या काही महिन्यांपासून आर्थिक मदतीपासून वंचित असल्याचे चित्र आहे.

सुरुवातीला मोठ्या संख्येने प्रस्ताव मंजूर होऊन महिलांच्या खात्यात दरमहा आर्थिक सहाय्य जमा होत होते. मात्र पडताळणीसाठी ई-केवायसी बंधनकारक करण्यात आल्यानंतर अनेकांची प्रक्रिया वेळेत पूर्ण झाली नाही. परिणामी नोव्हेंबर २५ पासून हप्ते थांबल्याची तक्रार लाभार्थी महिलांकडून करण्यात येत आहे.

ग्रामीण भागातील महिलांना सेवा केंद्रांवर वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत. 'सर्व्हर डाऊन', वीजपुरवठ्यातील अडथळे तसेच तांत्रिक कारणांमुळे प्रक्रिया रखडत असल्याने महिलांना रिकाम्या हाताने परतावे लागत असल्याची खंत व्यक्त होत आहे. काही महिलांनी आवश्यक कागदपत्रे आधीच जमा करूनही अंतिम प्रक्रिया पूर्ण न झाल्याने लाभ बंद झाल्याचे सांगितले.




माहिती भरताना झालेल्या चुका दुरुस्त करण्यासाठी शासनाने मुदतवाढ दिल्याची चर्चा असून, या कालावधीत ई-केवायसी पूर्ण करण्याची संधी द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे. केवळ तांत्रिक कारणांमुळे पात्र महिलांना अपात्र ठरवणे योग्य नाही, असा सवालही विरोधाककडून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, या गंभीर समस्येची दखल घेत संबंधित विभागाने लाभार्थींच्या तक्रारी विचारात घेऊन वरिष्ठांकडे प्रस्ताव पाठविण्याची तयारी दर्शवली असल्याची माहिती समोर येत आहे. आता थांबलेले हप्ते पुन्हा सुरू होणार का आणि महिलांच्या खात्यात 'लाडकी बहीण' योजनेचे पैसे जमा होणार का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## इतिहास जाणून घ्या

राज्यात कोणालाही कधीही जाग येत आहे व तिव्र आंदोलन करीत आहेत. आंदोलनामागील उद्देश काय सांगतो. कुणाचे समर्थन करावयाचे आहे याबाबत गंध दिसून येत नाही. नागरिक तर लांब विचारी नाहीत. त्यात हिंदू समाज हा भावनिक आहे. विचार न करता काही निर्णय घेत आहे. पहिल्यांदा एकी किती आहे या बाबत विचार केला जात नाही. देशात स्वातंत्र्यपुर्व काळात अनेकांची राज्य व सत्ता होती. मुस्लीम राष्ट्राने हिंदुस्थानची लुट केली. सोमनाथ मंदीर जे सोन्याचे होते ते लुटून घेवून गेले. भारतीय बघत राहीले. त्यानंतर देशात काय स्थिती होती. देशाची फाळणी झाली तरी कोणीही रोखू शकलो नाही. भारतात हिंदुस्थान संबोधल जाते कारण हिंदु समाज अधिक संख्येने होता व आजही आहे. त्यामुळे परत हिंदुराष्ट्र वगैरे बोलले जाते ते अयोग्य वाटते. जे आहे ते आहे, त्यात बदल कशासाठी? त्याच प्रमाणे देशात अनेक समाज राहातो. शिख, ईसाई, बौद्ध, ख्रिश्चन व मुस्लीम आदि असे समाज आहेत. केवळ एकाने वेगळे होण्याची मागणी केली. ती भारतीय नेत्यांनी देवूनही टाकले. ती मागणी फेटाळली असती, चालढकल केली असती तर आज काही समस्या निर्माण झाल्या नसत्या. झाल्या आहेत, त्या टळल्या असत्या. स्वातंत्र्याच्यावेळी अनेक समाज हा ब्रिटीशाच्या विरोधात लढला. अनेक राज्यात इतरांची सत्ता असताना ते बिनशर्त भारतात विलिन झाले. याकामी सरदार वल्लभभाई पटेल यांना विसरता येत नाही. त्याच प्रमाणे हिंदुस्थान हा एकोप्याने सर्व राहात असताना भारताचे विभाजन करून जी चुक झाली त्याचे भोग आजही भोगत आहोत. त्यात म्हैसूरचे राजा कसा होता. त्याची चाल कशी होती यात न जाता त्याची तुलना जर छत्रपती शिवाजी महाराज कदापी होवू शकत नाही. प्रत्येकाच्या मनात वेगवेगळे दैवत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज हे प्रत्येकाच्या मनात आहेत, मनातील दैवत आहेत. इतर देशात आपआपल्या परिने मोठे असतील. त्या-त्या राज्यात काम केले असेल ते असेल मात्र छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारखे दुसरा होणे शक्य नाही. ईतराशी तुलना होवू शकत नाही. त्यामुळे प्रत्येकांनी या बाबत काळजी घेतली पाहिजे. त्यापुर्वी इतिहास हा समजून घेतला पाहिजे. ईतिहास हा दाखला देत असतो. ईतिहास हा चुकीचा ठरत नाही. शिवाजी राजे हे महाराष्ट्राचे होते व आजही प्रत्येकाच्या मनात आहे. दैवत आहे. असे असताना कारण नसताना इतराशी तुलना करणे योग्य नाही. तुलना करणे म्हणजे आपल्याच पायावर दगड मारून घेणे आहे. त्यामुळे प्रत्येकांनी विचार केला पाहिजे. जे वादंग निर्माण होईल असे वक्तव्य का करावे? जनतेत संभ्रम निर्माण होईल असे का चालावे. देशात अनेक राजे होवून गेले. अनेक राज्य असताना एक होवून अखंड भारत निर्माण झाला. जम्मू काश्मीरचा राजा हरिसिंग होते. त्याला शेख अब्दुलाच्या चालीला बळी पडले. त्यामुळे दोन कायदे, दोन झेंडे झाले हा इतिहास अनेकांना माहिती नाही ते जाणून घेतला पाहिजे. ३७० कलम कशासाठी लागू केला. ते आता भाजपाने हटविला आहे. मात्र लागू कशामुळे तत्काळीन पंतप्रधानाने मान्यता दिली. हे इतरांना कसे कळले नाही. असे अनेक वादाचे मुद्दे उकरल्यावर कळतील. त्यामुळे नेत्यांनी कारण नसताना कांही मुद्दे उकरून काढतात कारण आपली स्वार्थाची पोळी भाजून घेण्यासाठी! त्यामुळे वादाचे मुद्दे व इतरांशी तुलना करणे योग्य नाही. वास्तविक हे प्रकार त्यांना माहिती असते की, अशा मुद्दयामुळे वातावरण दूषीत होणार आहे तरी मत व्यक्त केले जाते. त्यामुळे राज्यात वादंग दिसून येतो. वरचेवर राष्ट्रीय एकात्मक ठराविकांच्या बोलण्याने बिघडत असेल तर जनतेनी माफ न केले पाहिजे. देशात अनेक राज्यात आपली सत्ता आपल्याच ताब्यात राहावी यासाठी वादग्रस्त प्रकार होत आहेत. ईस्लाम राष्ट्रात किंबहून म्हैसूरच्या राजाचे स्मारक, फोटो आदि पाकिस्तानात दिसून येत नाहीत. ते मानत नाहीत. आपल्याकडे अशांतता निर्माण कशासाठी करावयाची हा मुद्दा समोर येतो. सर्व काही योग्य चाललेअसताना, यात मरण गोर-गरीबांच होते. एखाद्या गावात दोन-चार घरे असतात त्यांना जगणे कठिण होते. बोलणारे बोलतात. नको त्याच्याशी तुलना करतात, समर्थन करतात. याचा परिणाम हा चांगला होत नाही. दोन-चार घरे असणाऱ्यांवर संकट येते. त्याचे निरसण करीत नाहीत ही वस्तूस्थिती आहे. थोरांचे विचार, पुतळे उभा आहेत त्यांचा आदर्श घेतला जात नाही. केवळ रिकामा पुळका दिसून येत आहे. ही समाजात वस्तूस्थिती दिसून येत आहे. राज्यात काय देशात आपली सत्ता यावी. यासाठी नको ते वक्तव्य करीत आहेत. अमेरिकेतील घटनेचा संबंध जोडला जात आहे. पत्रकार परिषदा घेवून मत व्यक्त करीत आहेत. देशातील जनता मुर्ख नाही किंवा इतर कोणी काही सांगितले व जनतेनी एकले असे होत नाही. आता तर प्रत्येक व्यक्ती हा जिज्ञासू बनत आहे. माहिती घेत आहे. त्याच प्रमाणे स्वार्थासाठी तुलनात्मक बोलत आहे हे योग्य नाही. यापासून काहीच साध्य होणार नाही. झाशीची राणींची किर्ती जग असे पर्यंत राहाणार, राजे शिवाजी महाराज यांचे नावे जो पर्यंत सुर्य-चंद्र आहे तो पर्यंत राहाणार आहे. अशा राष्ट्राभिमानाची तुलना इतराशी होत नाही. त्यांचे गुण अंगी यावेत. शुरपना आपल्यातही यावा असे वाटते. काही मंडळींना देशात, राज्यात वाद निर्माण करावासे वाटतात. त्यांनी जनतेची नस ओळखली आहे. कशामुळे वाद होईल. कोणत्या कारणामुळे अशांतता निर्माण होईल याचा विचार करून वादग्रस्त घटना उकरून काढले जात आहेत हे देशातील किंबहून राज्यातील जनतनेनी ओळखले पाहिजे. काहीराजे शुरवीर, जनतेशी प्रामाणिक होते त्याला या समाजातील काही बोटावर मोजण्याइतक्यांनी बदनाम केले आहे. भारत देश सोन्याची खाण होता. सोने की चिडीया म्हणून ओळखले जात होते. हे तर चुकीचे नाही. या देशात शुरांची कमतरता नव्हती. देशातील काही बाबीवर नजर टाकली तर एक बाब समोर येते अनेक समाजापैकी काहीमंडळींचे काम, ठराविकांचे काम अशांतता माजविण्याचे आहे हा डाव किंवा कपटी वृत्ती राज्याबरोबर देशातील नागरिकांनी ओळखली पाहिजे. वादग्रस्त मुद्दे उपस्थित केले तरी त्याकडे दुर्लक्ष केले पाहिजे. त्याला अधिक महत्त्व न देणे हाच एकमेव उपाय आहे. हे सतत लक्षात घेतले पाहिजे.

# लातूर शहर जिल्हा भाजपाच्यावतीने काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांचा निषेध

### देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून तात्काळ हकालपट्टी करण्याची मागणी



**लातूर/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांची तुलना करून त्यांना समकक्ष ठरविण्याचा जो दुर्दैवी आणि महाराष्ट्राच्या अस्मितेवर घाला घालण्याचे जे वक्तव्य केले आहे. ते निदंनिय असून या बद्दल त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून काँग्रेस पक्षाने त्यांची तात्काळ पदावरून हकालपट्टी करावी, अशी मागणी लातूर शहर जिल्हा भाजपाच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केली आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल जे वक्तव्य केले आहे. त्या वक्तव्याचा निषेध करण्यासाठी शहरजिल्हा भाजपाच्या वतीने लातूर येथील काँग्रेस भवनसमोर भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले होते. या प्रसंगी हर्षवर्धन सपकाळ यांच्या विरोधात घोषणाबाजी करून त्यांच्या प्रतिमेचे दहन करण्यात आले. यावेळी माजी शहर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक देविदास काळे, सरचिटणीस संजय गीर, प्रविण कस्तुरे, मनपा गटनेते ॲड. दिपक मठपती आदींची प्रमुख उपस्थिती होती.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांची तुलना करून हे दोन्ही राजे एकाच कक्षेत आणण्याचे वक्तव्य केले आहे. त्यांचे हे वक्तव्य म्हणजे महाराष्ट्राच्या अस्मितेवर घाला घालण्याचा प्रकार असल्याचे सांगून या माध्यमातून काँग्रेस धर्मा-धर्मात तेढ निर्माण करत असल्याचे अजित पाटील कव्हेकर यांनी स्पष्ट केले. छत्रपती शिवाजी महाराज यांनी समान न्याय, स्त्री सन्मान आणि लोककल्याण या भक्कम तत्वावर स्वराज्य निर्माण केले होते. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण जगाची अस्मिता आहे. मात्र सपकाळ यांनी हे वक्तव्य करून काँग्रेसचा खरा चेहरा समोर आणला असल्याचा आरोप अजित पाटील कव्हेकर यांनी केला. टिपू सुलतान यांनी त्यांच्या कारकिर्दीत भारतासह इतर देशांमध्येही धर्मांतराचे अघोरी प्रकार केले असल्याचे या माध्यमातून अनेकांवर अन्याय व अत्याचारही केले असल्याचे अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांचे हे वक्तव्य म्हणजे इतिहासाची मोडतोड करण्याचा प्रयत्न असून इतिहास पुसण्याचा घृणास्पद प्रकार समोर आला असल्याचा आरोप कव्हेकर यांनी केला. छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांची तुलना कधीच होवू शकत नाही. छत्रपती शिवाजी महाराज हे प्रत्येक समाज व धर्मासाठी आदर्श राजे होते,असे स्पष्ट करून या प्रकारामुळे महाराष्ट्रासह जगभरातील शिवप्रेमींची भावना दुखवली असून याबद्दल संताप व्यक्त करण्यात येत आहे. हा प्रकार निदंनिय असून त्यांच्यावर तात्काळ देशद्रोहाचा गुन्हा दाखल व्हावा, आणि काँग्रेस पक्षाने त्यांची प्रदेशाध्यक्षपदावरून हकालपट्टी करावी, अशी मागणी शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केली. या मागण्या मान्य न झाल्यास यापेक्षाही तिव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा कव्हेकर यांनी यावेळी दिला.

या आंदोलनात शहर जिल्हा सरचिटणीस तथा नगरसेविका रागिणी यादव, अदिती पाटील कव्हेकर, शोभा पाटील, संगिता मिर्चे, सत्यवती चेवले, राजश्री धोत्रे, ऋषिकेश राजे, अनंत गायकवाड, मंडलाध्यक्ष रोहित पाटील, राहुल भुतडा, सुरेश जाधव, ज्योतिराम चिवडे, पवन आल्टे, अभिजीत मुनाळे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'संशोधन लेखन मसुदा' विषयावर एकदिवसीय कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद एज्युकेशन सोसायटी संचलित दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स, लातूर येथील पी.जी. प्रोजेक्ट रिसर्च कमिटीच्या वतीने ''संशोधन लेखन मसुदा'' या विषयावर एकदिवसीय मार्गदर्शक सत्राचे आयोजन करण्यात आले. हे सत्र दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सतीश लक्ष्मणराव कुंडलवार, सहयोगी प्राध्यापक, शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ यांनी संशोधन लेखनाची रूपरेषा, लेखन पद्धती, संशोधनातील महत्त्वाचे घटक तसेच संशोधन लेख सादरीकरणाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. जी.आर. लहाने, डॉ. बी.टी. चव्हाण व डॉ. एम.एस. आष्टेकर यांची विशेष उपस्थिती लाभली. प्रस्तावना डॉ. बी.जी. कळंबे यांनी केली. सूत्रसंचालन रेश्मा सय्यद यांनी केले, तर आभार प्रदर्शन वर्षा पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. विशाल वर्मा, डॉ. रूपा गिल्डा, डॉ. अनुजा कांबळे, प्रा. ऐश्वर्या कुलकर्णी, प्रा. साक्षी पाटील, प्रा. सुहाना शेख व प्रा. अमृता बनसोडे यांनी विशेष परिश्रम घेतले. हे सत्र विद्यार्थ्यांसह संशोधन करणाऱ्या अभ्यासकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरले असून, संशोधन लेखनाबाबत नवे दृष्टिकोन मिळाल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली.

# 'राजमाता जिजामाता'च्या एम. ए. एज्युकेशनच्या विद्यार्थिनीला सुवर्णपदक



**लातूर/प्रतिनिधी :** येथील राजमाता जिजामाता अध्यापक महाविद्यालयाची विद्यार्थिनी आरती पांडुरंग कोल्ले यांनी एम.ए. एज्युकेशन मार्च २०२५ परीक्षेत नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदकाच्या मानकरी ठरल्या आहेत. यामुळे 'लातूर पॅटर्न'च्या यशात मानाचा तुरा रोवला गेला आहे. याबद्दल राजमाता जिजामाता अध्यापक महाविद्यालयातर्फे संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते फेटा, शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.

नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अंतर्गत लातूरच्या राजमाता जिजामाता अध्यापक महाविद्यालयात २०२२ पासून एम.ए. एज्युकेशन केंद्र सुरू आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या शिक्षकांना २४ वर्षांची वेतनश्रेणी मिळते. मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून राजमाता जिजामाता अध्यापक महाविद्यालयाची विद्यार्थिनी आरती पांडुरंग कोल्ले यांनी विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावत त्या सुवर्णपदकाच्या मानकरी ठरल्या आहेत.

या यशाबद्दल विद्यापीठात कुलगुरू डॉ. सोनवणे, प्र. कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, लेखाधिकारी कटलाकुटे व विभाग प्रमुख डॉ. संजीवनी महाले यांच्या उपस्थितीत दीक्षांत समारंभात सुवर्णपदक देऊन गौरविण्यात आले. या परीक्षेचा महाविद्यालयाचा शंभर टक्के निकाल लागला आहे. या यशाबद्दल महाविद्यालयातर्फे आरती कोल्ले यांचे कौतुक करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, एम.ए. एज्युकेशन केंद्राच्या समन्वयक स्वाती केंद्रे, प्रा. अशविनी केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, प्रा. विजयकुमार लोहारे, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर, विष्णू कराड आदी उपस्थित होते.

या यशाबद्दल शिक्षक आमदार विक्रम काळे, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. बाबासाहेब भोसले, शिक्षण उपसंचालक डॉ. दत्तात्रय मठपती, शिक्षण सहसंचालक संजय पंचगल्ले, विद्यापीठातील बी. एड.चे डीन डॉ. चंद्रकांत बाविस्कर, डॉ. वैजयंता पाटील, शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे आदींनी कौतुक केले आहे.

## किडनीच्या समस्या असल्यास करा 'ही' ४ योगासने, मिळेल फायदा



आजकाल बरेच लोक किडनीशी संबंधित समस्यांनी ग्रस्त आहेत. किडनीच्या आजारामुळे कधीकधी इतर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. कारण किडनी हे शरीराच्या महत्वाच्या अवयवांपैकी एक आहे. ते लघवीद्वारे विषारी पदार्थ बाहेर काढण्यास आणि रक्त शुद्ध करण्यास मदत करतात.

योगामुळे किडनीच्या समस्या कमी होण्यास, किडनीचे कार्य सुधारण्यास, रक्तातील साखर आणि उच्च रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत होते. तसेच इतर आरोग्य समस्या टाळण्यास आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत होऊ शकते. किडनीचे रुग्ण निरोगी राहण्यासाठी आणि किडनीच्या समस्या कमी करण्यासाठी तज्ञांच्या सल्ल्यानुसार योगा करू शकतात. आपण जाणून घेऊया की किडनीच्या रुग्णांनी कोणते योगासन करावेत

**किडनीच्या समस्यांसाठी खरंच योगासने करावी का?**

तज्ज्ञांच्या मते किडनीच्या समस्येचे निदान झाले आणि सुरुवातीला काही लक्षणे दिसून आली, तर तज्ञांच्या देखरेखीखाली हलकाफुलका व्यायाम करा. या काळात, नाडी शोधन प्राणायाम करणे विशेषतः फायदेशीर आहे. पण तुम्हाला बरे वाटत असले तर तुम्ही डॉक्टर आणि तज्ञांच्या देखरेखीखाली योगासने करण्याचा प्रयत्न करा.

**मंडुकासन–**

मंडूकासन हे अतिशय फायदेशीर योगासन आहे. मंडूकासन केल्याने किडनी आणि यकृताच्या समस्या दूर होतात आणि पचनक्रिया व्यवस्थित राहते. याव्यतिरिक्त, किडनीचे रुग्ण कपालभाती प्राणायाम देखील करू शकतात.

**सेतुबंधासन–**

सेतुबंधासन, ज्याला ब्रिज पोज असेही म्हणतात. सेतुबंधासन केल्याने किडनी आणि मज्जासंस्थेचे कार्य सुधारण्यास मदत होते आणि रक्तातील साखर नियंत्रित करण्यास मदत होते.

**पश्चिमोत्तानासन**

नियमितपणे पश्चिमोत्तानासन केल्याने किडनीचे कार्य आणि पचन सुधारण्यास मदत होते.तसेच चांगले आरोग्य मिळते आणि शरीरातील रक्ताभिसरण सुधारते.

**पवनमुक्तासन–**

नियमितपणे पवनमुक्तासन केल्याने किडनीचे कार्य आणि पचन सुधारण्यास मदत होते. तसेच किडनीवरील चरबी कमी करण्यास मदत होते. ज्यामुळे किडनी निरोगी आणि स्वच्छ राहते.

## वजन कमी करण्यासाठी खा 'हे' पदार्थ, महिन्यात व्हाल एकदम सडपातळ



आजकाल जंकफूड आणि बैठ्या कामाच्या पद्धतींमुळे वजन वाढण्याची समस्या खूप सामान्य झाली आहे. अनेक लोकांमध्ये पोटाचे प्रमाण वाढते, त्यानंतर त्यांचा आत्मविश्वासही कमी होतो. परंतु व्यस्त जीवनशैलीमुळे, तुम्ही व्यायाम आणि योग्य आहाराकडे लक्ष देऊ शकत नाही आणि याचा तुमच्या आरोग्यावर परिणाम होतो, ज्यामुळे वजन वाढते.

वाढत्या वजनावर नियंत्रण ठेवण्यासाठी व्यायाम आणि निरोगी आहार घेणे खूप महत्वाचे आहे. असे अनेक पदार्थ आहेत जे वजन कमी करण्यास मदत करू शकतात. वजन कमी करण्यास मदत करू शकणाऱ्या या पदार्थांबद्दलआपण जाणून घेऊया

**फळे–**

फळे फायबरने समृद्ध असतात. फळांमध्ये पेक्टिन आणि नैसर्गिक गोड पदार्थांसारखे विरघळणारे तंतू भरपूर असतात. ते पचन सुधारतात आणि गोड पदार्थांची इच्छा कमी करतात. नाशपातीमध्ये विशेषतः पेक्टिन भरपूर प्रमाणात असते, एक प्रकारचा विरघळणारा फायबर जो पचन सुधारतो आणि वजन नियंत्रित करण्यास मदत करतो.वजन कमी करण्यासाठी संत्री, सफरचंद,जांभूळ, कलिंगड,पेरू अशी फळे खावीत.

**हिरव्या पालेभाज्या–**

हिरव्या पालेभाज्या वजन कमी करण्यासाठी देखील फायदेशीर आहेत. पालेभाज्या केवळ मॅग्नेशियम आणि लोहाने समृद्ध नसतात तर फायबरनेदेखील समृद्ध असतात. ते शरीराला डिटॉक्स करण्यास आणि पचन सुधारण्यास मदत करतात.तसेच अतिरिक्त कॅलरीज न देता पोट भरण्यास मदत करतात. ते यकृत विषमुक्त करण्यास आणि हार्मोनल संतुलनास देखील मदत करतात. म्हणून आहारात पालक, मेथी, राजगिरा खाऊ शकता.

**कडधान्ये–**

वजन नियंत्रित करण्यासाठी, तुमच्या आहारात मूग, हरभरे, मसूर अशा कडधान्यांचा समावेश करा. यामध्ये एक विरघळणारे फायबर असते जे खराब कोलेस्ट्रॉल कमी करते आणि भूक नियंत्रित करते. चांगल्या आरोग्यासाठी, रिफाइंड कार्बोहायड्रेट्सऐवजीया कडधान्यांचा समावेश फायदेशीर आहे.

**सीड्स–**

चिया आणि जवस बिया वजन कमी करण्यासाठी देखील फायदेशीर आहेत. कारण ते विरघळणारे फायबर आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिडने समृद्ध आहेत. चिया सीड्स पाणी शोषून घेतात आणि पोटात विस्तारतात, ज्यामुळे तुम्हाला जास्तवेळ पोट भरल्यासारखे वाटते. जवसाच्या बियांमध्ये लिग्नान्स असतात, जे अंतर्गत चरबी कमी करण्यासाठी आणि हार्मोनल आरोग्य सुधारण्यासाठी ओळखले जातात. दररोज एक-एक चमचा सेवन करू शकता.

# बांगला देशाचा कौल



धर्मांध, अतिरेकी व पाकिस्तान धार्जिण्या पक्षांना तसेच जहाल युवा संघटनेस बांगला देशाच्या मतदारांनी दूर ठेवले आहे. बीएनपीला पाठिंबा देताना लोकशाही, आर्थिक व सामाजिक स्थैर्य यांना तेथील जनतेने कौल दिला आहे.

बांगला देशाच्या संसदेसाठी 'जातियो संसद' झालेल्या निवडणुकीत बांगला नॅशनलिस्ट पार्टी या पक्षाने दोन तृतीयांश बहुमत मिळवले आहे. माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचा पक्ष सुमारे दोन दशकांनंतर सत्तेत आला आहे. या पक्षाची सूत्रे आता त्यांचे चिरंजीव तारिक रहमान यांच्याकडे आहेत आणि आता त्यांची पंतप्रधानपदी निवड होणे निश्चित आहे. ३०० जागांच्या संसदेत 'बीएनपी'ने २१० जागा मिळवल्या असल्याने त्यांना सरकार बनवण्यासाठी अन्य पक्षाच्या मदतीची गरज उरलेली नाही. जमात-ए-इस्लामी या कट्टरपंथी पक्षास ६८ जागा मिळाल्या. सुमारे दीड वर्षांपूर्वी बांगला देशात युवकांनी उठाव केला व शेख हसीना यांचे सरकार उलथवले. युवकांच्या नॅशनलिस्ट सिटिझन पार्टी या पक्षाने ३० जागा लढवल्या; मात्र त्यांना केवळ ६ जागा जिंकता आल्या. बांगला देशाच्या जनतेने लोकशाही व स्थैर्याला पाठिंबा दिला आहे, हे या निकालावरून स्पष्ट होते. हसीना यांच्या अवामी लीग पक्षावर हंगामी सरकारने बंदी घातल्याने तो पक्ष निवडणूक लढवू शकला नव्हता. हसीना यांनी ही निवडणूक म्हणजे 'विनोद' असल्याची टीका केली आहे. उठाव व हंगामी सरकारचे धोरण यामुळे ताणलेले भारत-बांगला देश यांचे संबंध पुन्हा सुरळीत होण्याची आशा आता निर्माण झाली आहे.

**संबंध सुधारतील का?**

तारिक रहमान सुमारे १७ वर्षांच्या विजनवासातून गेल्या २५ डिसेंबर रोजी मायदेशी परतले. तेथील जनतेने त्यांचे ज्या पद्धतीने स्वागत केले त्यावरून देशाची सूत्रे त्यांच्याकडे जातील अशी अटकळ बांधली जात होती. तो अंदाज आता खरा ठरत आहे. अधिकृत निकाल जाहीर होण्याआधीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तारिक यांचे अभिनंदन केले. गेल्या दीड वर्षांतील तेथील घडामोडी, बदलती जागतिक राजकीय समीकरणे यांचा संदर्भ यामागे आहे. हसीना यांच्या राजवटीत काही मतभेद असले तरी बांगला देश भारताचा मित्र होता; परंतु उठावानंतर महमद युनुस यांच्या नेतृत्वाखालील हंगामी सरकारचे धोरण कटुता निर्माण करणारे ठरले. त्यांच्या कारकीर्दीत धार्मिक अल्प संख्याकांवरील हल्ल्यांच्या २९०० घटना नोंदल्या गेल्याचे भारताने दाखवून दिले आहे. भारतीय दूतावासालाही लक्ष्य करण्यात आले होते. धर्मांध अतिरेक्यांना वेसण घालणे व धार्मिक अल्पसंख्याकांचे रक्षण करण्याची जबाबदारी तारिक यांच्यावर आहे. धार्मिक स्वातंत्र्य देण्याचे व सामाजिक सलोखा जपण्याचे आश्वासन तारिक यांनी दिले आहे; मात्र त्याच्या अंमलबजावणीत त्यांची कसोटी लागणार आहे. हसीना यांचे वर्तन एकाधिकारशाहीचे असल्याचे आरोप अनेक वर्षे होत होते. उठावानंतर अवामी लीगच्या नेत्यांवर व कार्यकर्त्यांवरही हल्ले झाले. हे राजकीय वैमनस्यही तारिक यांना संपवणे आवश्यक आहे. या निवडणुकीबरोबरच घटनात्मक सुधारणांवरही सार्वमत घेण्यात आले होते. त्यास 'जुलै नॅशनल चार्टर' असे संबोधले जाते. मतदानात भाग घेतलेल्यांपैकी ७० टक्के जणांनी त्यास पाठिंबा दिला. संसदेत वरिष्ठ सभागृहाची निर्मिती करणे, न्यायसंस्था व अन्य महत्त्वाच्या संस्था राजकीय प्रभावापासून मुक्त ठेवणे, पंतप्रधानपदाची मुदत मर्यादित करणे अशा ८४ सुधारणांचा त्यात समावेश आहे. या सुधारणा तारिक कशा अमलात आणतात हे पाहाणे औत्सुक्याचे आहे. सीमेपलीकडून भारतात होणारी घुसखोरी, पाणी वाटप असे काही मुद्दे भारत व बांगला देशादरम्यान वादाचे आहेत. हसीना यांनी ते वाढू दिले नव्हते. नव्या राजवटीचा दृष्टिकोन काय असेल यावर दोन्ही देशांतील संबंधांची दिशा ठरेल. कापूस, सूत यांची बांगला देश भारतातून मोठी आयात करत असे. अमेरिकेशी त्यांनी करार केल्याने ही आयात घटेल. व्यापारी संबंध सुधारण्याचे याबरोबरच हसीना भारतात असल्याने एक राजनैतिक आव्हान दोन्ही देशांसमोर आहे. त्यातून दोघांनाही सामोपचाराने मार्ग काढावा लागेल. चीन व म्यानमार यांच्यामधील 'बफर' राज्य या नात्याने बांगला देश भारतासाठी महत्त्वाचा



## निरोगी जीवनासाठी संतुलित आहार

रोज ३०-४५ मिनिटे व्यायाम, पुरेसे पाणी (८-१० ग्लास) आणि ७-८ तासांची शांत झोप आवश्यक आहे १, ३, ६। रोजच्या आहारात फळे, भाज्या आणि कडधान्यांचा समावेश करा, साखर व प्रक्रिया केलेले अन्न टाळा ५, ८। मानसिक आरोग्यासाठी योगासने करा, धूम्रपान/मद्यपान टाळा आणि वेळेवर आरोग्य तपासणी करा २, ४, ७।

महत्त्वाच्या आरोग्य टिप्स-संतुलित आहार: आहारात प्रथिने (ीींशिळपी), फायबर आणि पौष्टिक पदार्थांचा समावेश करा ५। व्यायाम: दररोज ३०-४५ मिनिटे चालणे, धावणे किंवा योगासने केल्याने रक्तातील साखर नियंत्रित राहते आणि तणाव कमी होतो २।

पाणी पिणे: दिवसभरात पुरेसे (सुमारे २-३ लिटर) पाणी प्या ३। झोप: रात्री ७-८ तासांची सलग झोप घेणे अत्यंत आवश्यक आहे.

# दररोज भात खाण्याचे प्रमुख आरोग्यदायी फायदे जाणून घ्या

भारतीय आहार पद्धतीत, विशेषतः कोकण आणि दक्षिण भारतात, भात (ठळलश) हा जेवणाचा मुख्य भाग आहे. अनेकदा वजन वाढण्याच्या भीतीमुळे लोक भात खाणे टाळतात, पण जर योग्य प्रमाणात आणि योग्य पद्धतीने भात खाल्ला तर त्याचे शरीराला अनेक आश्चर्यकारक फायदे होतात.

-ङडज ठए-ऊ वयाची चाळीशी ओलांडलीये? मग तुमच्या आहारात 'या' ५ गोष्टी असायलाच हव्या

डायटिंग करणारे तांदुळाचे पदार्थ खाणे टाळतात. पण काय आपल्या माहीत आहे की भात खाण्याचे किती फायदे आहेत? प्रत्येक पदार्थांप्रमाणे तांदूळ खाणेही आरोग्यासाठी फायदेशीर आहे पण लिमिटमध्ये. तसेच मधुमेह आणि दमा रोगींसाठी मात्र तांदूळ नुकसान करू शकतं, कारण याची प्रकृती थंड असते. तर चला पाहू या भात खाण्याचे फायदे:



दररोज भात खाण्याचे प्रमुख आरोग्यदायी फायदे खालीलप्रमाणे आहेत:

१. ऊर्जेचा उत्तम स्रोत (एलशश्रश्रशपीं डीीलश ेष एपशीसू)

भात हा कार्बोहायड्रेट्सचा (उरीले-हूवीरींशी) मुख्य स्रोत आहे. जेव्हा आपण भात खातो, तेव्हा त्याचे रूपांतर ऊर्जेत होते. त्यामुळे शरीराला त्वरित ताकद मिळते आणि थकवा दूर होतो. दिवसभर काम करण्यासाठी लागणारी ऊर्जा भातामधून मिळते.

होळीला घरी जाणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी; मुंबई वरून वाराणसी आणि गोरखपूरकरिता विशेष गाड्यांची घोषणा

२. पचायला अतिशय हलका चपाती किंवा भाकरीच्या तुलनेत भात पचायला खूप हलका असतो.

त्यामुळेच आजारपणात, ताप आला असेल किंवा पोट बिघडले असेल, तर डॉक्टर 'मऊ भात' किंवा 'खिचडी' खाण्याचा सल्ला देतात.

रात्रीच्या वेळी पचनशक्ती मंदावते, त्यामुळे रात्री चपातीऐवजी थोडा भात खाणे पोटासाठी आरामदायी ठरते.

-ङडज ठए-ऊ व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता पूर्ण करण्यासाठी आहारात या शाकाहारी पदार्थांचा समावेश करा

३. ग्लूटेन-मुक्त अन्न- गहू किंवा मैद्यामध्ये 'ग्लूटेन' असते, ज्यामुळे काही लोकांना लर्जी किंवा पचनाचा त्रास होतो. भात हा नैसर्गिकरित्या ग्लूटेन-मुक्त (ऋश्रीींशप-षीशश) असतो. ज्यांना गव्हाची लर्जी आहे, त्यांच्यासाठी भात हा सर्वोत्तम पर्याय आहे.

# झोपेची कमतरता अर्थव्यवस्थेसाठीही धोकादायक





भारताचे वर्षाला १५० अब्ज डॉलरचे नुकसान

नवी दिल्ली : सध्याच्या जीवनशैलीचे विविध परिणाम आपल्यावर दिसतात. जीवनशैलीमुळे होणारे आजारांची तीव्रता केवळ शरीरापुरती मर्यादित नसून ती अप्रत्यक्षपणे आपल्या अर्थव्यवस्थेवर देखील प्रभाव टाकत आहे. वेगवान आणि तंत्रज्ञानावर आधारित जीवनशैलीचा मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून, झोपेची कमतरता ही एक जागतिक समस्या निर्माण झाली आहे.

एका सर्वेक्षणानुसार, जागतिक लोकसंख्येपैकी सुमारे १६ टक्के लोक निद्रानाशाचे बळी आहेत. या समस्येचा फटका केवळ व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यालाच बसत नाही, तर त्यांच्या उत्पादकतेवर देखील होताना दिसतो. या परिणामामुळे अर्थव्यवस्थेला १५० अब्ज डॉलर्सचा मोठा आर्थिक फटका बसत आहे.

या अहवालांतून काही निशाकर्ष समोर आले आहेत त्याची थोडी माहिती घेऊ :

झोपेचा घटता आलेख आणि कारणे :

गेल्या एका शतकात लोकांच्या झोपेची वेळ तब्बल दोन तासांनी कमी झाली आहे.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम-लॅन्सेटच्या अभ्यासानुसार, १९१० मध्ये एक व्यक्ती सरासरी ९ तास झोपायची, ती वेळ २०२५ पर्यंत घटून ६.१० तासांवर आली आहे. स्मार्टफोन आणि हायस्पीड इंटरनेटच्या अतिवापरामुळे गेल्या दोन दशकांत झोपेची जागतिक सरासरी ६.८ तास आणि भारताची सरासरी ६.५ तास इतकी आहे.

भारताची स्थिती चिंताजनक

ङ्फिटबिटफच्या सर्वेक्षणात असे आढळले की, भारतीय जगातील सर्वांत कमी झोपणाऱ्या लोकांपैकी एक आहेत. सुमारे ५९ टक्के लोक रात्री ६ तासांपेक्षा कमी झोप घेत आहेत. झोपेच्या कमतरतेमुळे भारताचे वार्षिक आर्थिक नुकसान १५० अब्ज डॉलर्स इतके होते, तर अमेरिकेला १३८ अब्ज डॉलर्स व जपानला ४११ अब्ज डॉलर्सचा फटका बसत आहे.

या समस्येचा फटका आरोग्य कर्मचारी, सुरक्षा रक्षक, पोलीस, प्रसारमाध्यमांतील व्यक्तींवर जास्त होत आहे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



**पाळीविषयी बोलूया:** हे यासह सामायिक करा ऋलशलेज्ञ हे यासह सामायिक करा चर्शीशप-सशी हे यासह सामायिक करा ढुळींशी हे यासह सामायिक करा ईमेल शेअर करा पाळीदरम्यान सहवास यात अशास्त्रीय काहीच नाही. सूचना : लेखातील मजकूर प्रौढांसाठीचा आहे.पाळीदरम्यान सेक्स हा विषय भारतीय समाजात कदाचित अगदी विचित्र वाटणारा असू असतो. पण पाश्चिमात्य देशांमध्ये यासंदर्भात संशोधन सुरू आहे.

## २ Joke विनोद






शिक्षक : सांग बंडू, चहा लाभदायक की नुकसानकारक?

बंडू : कुणी पाजला तर लाभदायक, पाजावा लागला तर नुकसानकारक.

## ३ Message संदेश



Teri dosti me diwane ho gaye,
Tujhe apna banate banate began ho gaye.
Pukaar le ek baar pyar se mere dost
Bandar ki awaz sune zamane ho gaye

## ४ Thought सुविचार




औदुबंराच्या आडव्यातिडव्या पाय वाटासारखे.

**संस्कृत सुभाषित**

**न व्याधिः न विषम् न आपत्तथा न आधिश्चभूतले ।**
**खेदाय स्वशरीस्थं मौर्ख्यम् एकं यथानृणाम् ।।**

**अर्थ :** स्वत:चा मूर्खपणा माणसाला जितका खेदजनक असतो, त्याप्रमाणे आजार, विषय, संकटे आणि मनोव्यथासुद्धा दु:खदायक नसतात.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. पुलंचा लेखक म्हणून अखेरचा चित्रपट- 'एक होता -----'
३. वार्ताहर
७. दाद, पोहोच
९. स्पष्ट उच्चार करता न येणारा
१०. गतीमान
१२. आरोळी
१४. यावर्षी
१५. गडीमाणसे
१८. 'नॅनो' आणणारे टाटा
२१. कंटाळवणे (भाषण)
२३. करायला गेला मारुती आणि झाले ---!
२५. राष्ट्राची सीमा
२९. मोका, संधी
३१. विश्वासघातकी
३२. खाटीक
३३. पदर
३४. दबा धरणे
३६. किरकोळ सामान
३९. आश्चर्याची गोष्ट
४२. आमटे, आढाव या समाजसेवकांचे प्रचलित नाव
४४. मोठी गाडी (सं.)
४६. दारावरील खुणेचा आवाज
४८. सजीव-निर्जीव सर्व
५०. नाकावरचा राग
५२. एक जंगली फूल
५३. भिक्षापात्र
५४. रक्त देणे
५७अ. कूळ कायद्याचे मूळ तत्त्व
६१. तात्काळ
६४. विषमच्या विरुद्ध
६६. केसांची बट
६८. पावलोपावली
६९. श्री विष्णूचे एक नाव
७१. किंचित वाकडा
७३. नवरत्नांपैकी एक प्राणिज रत्न
७४. कारस्थानी
७५. दाट, घट्ट
७६. अभिप्राय

### उभे शब्द

१. प्रशाला
२. क्रिकेटमधील सहाचा फटका
३. च्या बद्दल
४. अखेर, शेवट
५. वैरी
६. अंगातीक मस्ती, जोम
७. जन्मदाता
८. मनात संशय निर्माण होणे याअर्थी वाक्प्रचार
११. बडबड्या
१३. पद्धतीनुसार
१६. लक्ष्मी
१७. बाजू, काठ
१९. पुरुष
२०. खोट्या नाण्याचा आवाज
२२. टाळाटाळ, चुकवाचुकव
२४. वार
२६. हद्दीच्या पलीकडे
२७. मिठाची चव
२८. शिर्डीचे संत
२९. अमावस्या
३०. वारा (सं.)
३१. होम
३५. सैन्याचे पथक
३७. घाबरणे
३८. तफावत, अंतर
४०. जंगलात विहार करणारे प्राणी
४१. परमेश्वर
४२. भारतभूषणचा गाजलेला सिनेमा, बैजू ---
४३. केर
४५. प्रेतावरील कापड
४६. रोखलेली नजर
४७. शेंगेवरील आवरण
४९. युद्ध, मारामारीत रक्त सांडणे
५१. घटस्फोट
५३. दगडाचा पातळ पापुद्रा
५५. नाठाळ, आडमुठ्या
५६. खळबळजनक
५७. चुलती
५८. सेनानायक
५९. हिंदीत राजीनामा
६०. वजनदार
६२. पाण्याचा गोंगाट?
६३. स्पष्टवक्ता, तोंडाळ
६५. शूर पुरुष
६७. हिंदुस्थान
६९. सततचे नामस्मरण
७०. पर्वत
७२. समान, तुल्यबळ

### आडवे उत्तरे

१.विदूषक ३.बातमीदार ७.पोचपावती ९.बोबडा १०.वेगवान १२.ललकारी १४.यंदा १५.चाकरचुकर १८.रतन २१.रटाळ २३.माकड २५.सरहद २९.अवसर ३१.हरामखोर ३२.कसाई ३३.पालव ३४.टपणे ३६.सटरफटर ३९.नवलाई ४२.बाबा ४४.शकट ४६.टकटक ४८.चराचर ५०.फणकारा ५२.कणेर ५३.कटोरा ५४.रक्तदान ५७अ. कसेल त्याची जमीन ६१.तडकाफडकी ६४.सम ६६.लट ६८.पदोपदी ६९.जनार्दन ७१.वाकडसर ७३.मोती ७४.कपटी ७५.गर्द ७६.रत

### उभे उत्तरे

१.विद्यालय २.षटकार ३.बाबत ४.तडा ५.दावेदार ६.रग ७.जनक ८.पाल चुकचुकणे ११.वाचाळ १३.रीतसर १६.रमा १७.कड १९.नर २०.खोट्या नाण्याचा आवाज २२.टालमटोला २४.घाव २६.हद्दपार २७.खारट २८.साईबाबा २९.अवस ३०.समीर ३१.हवन ३५.पलटण ३७.टरकणे ३८.फरक ४०.वनचर ४१.ईश ४२.बावरा ४३.कचरा ४५.कफन ४६.टक ४७.टरफल ४९.रक्तपात ५१.काडीमोड ५३.कपची ५५.खट ५७.काकी ५८.सेनापती ५९.त्यागपत्र ६०.जड ६२.कालवा ६३.फटकळ ६५.मर्द ६७.भारत ६९.जप ७०.नग ७२.सर




## थोडक्यात/ संक्षिप्त



### टी२० मध्ये 'या' बिहारीची कमाल! धोणी चा फॉर्म्युला वापरुन उभारला धावांचा डोंगर

दिल्ली-२०२६ च्या टी-२० विश्वचषकासाठी यूएईने आपले खाते उघडले आहे. अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या सामन्यात संघाने कॅनडाविरुद्ध विजय मिळवला. कॅनडाने यूएईसमोर विजयासाठी १५१ धावांचे लक्ष्य ठेवले होते. १६ षटकांनंतर संघाने फक्त ९५ धावा केल्या होत्या. १७ व्या षटकापासून सोहेब खान आणि आर्यनश शर्मा यांनी प्रतिआक्रमण सुरू केले. यूएईने दोन चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला. टी-२० विश्वचषकात एका नवीन बिहारीने प्रवेश केला आहे, त्याने त्याच्या कारकिर्दीतील फक्त पाचव्या टी-२० सामन्यातच धमाल केली आहे.हा स्फोटक फलंदाज भारताकडून नाही तर यूएईकडून खेळत आहे. त्याने अफगाणिस्तानविरुद्ध धावांचा वर्षाव केला आहे.

### अफगाणिस्तानचा युएई वर विजय; दक्षिण आफ्रिकेला मोठा फायदा

नवी दिल्ली-टी-२० विश्वचषकाच्या २८व्या सामन्यात, अफगाणिस्ताननं शेवटच्या षटकापर्यंत रंगलेल्या रोमांचक सामन्यात युएईचा ५ विकेट्सनं पराभव केला. हा अफगाणिस्तानचा स्पर्धेतील पहिला विजय होता. मात्र, सुपर-८ मध्ये पोहोचण्याच्या त्यांच्या शक्यता कमी आहेत. सामन्यात प्रथम फलंदाजी करताना युएईनं १६० धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल, अफगाणिस्ताननं शेवटच्या षटकापर्यंत गेलेल्या सामन्यात ५ विकेट्स गमावून सामना जिंकला. अफगाणिस्तानच्या विजयासह, दक्षिण आफ्रिका सुपर-८ मध्ये पोहोचणारा तिसरा संघ बनला.

रशिद खानचा विक्रम : अफगाणिस्तानचा दिग्गज लेग स्पिनर आणि कर्णधार रशीद खान हा जगातील सर्वोत्तम टी-२० गोलंदाजांपैकी एक मानला जातो. त्यानं टी-२० स्वरुपात एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. या स्वरुपात ७०० बळी घेणारा तो जगातील पहिला गोलंदाज ठरला. टी-२० विश्वचषकात यूएईविरुद्धच्या सामन्यात त्यानं ही कामगिरी केली. या सामन्यात त्यानं मोहम्मद अरफानला बाद करत एक विकेट घेतली. यासह त्यानं टी-२० क्रिकेटमध्ये एक नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे. यापूर्वी कोणत्याही गोलंदाजानं टी-२० स्वरुपात ७०० बळी घेण्याचा विक्रम केलेला नाही.

### वर्ल्डकपमध्ये जागा टिकविण्यासाठी ऑस्ट्रेलियाचे स्टीव्हन स्मिथला निमंत्रण

मुंबई-दुखापतींचे ग्रहण, खराब फॉर्म आणि झिम्बाब्वेविरुद्ध झालेला अनपेक्षित पराभव यामुळे ऑस्ट्रेलियावर प्राथमिक फेरीतूनच गाशा गुंडाळावा लागण्याची नामुष्की ओढवू शकते. हा प्रसंग ओढवू नये यासाठी ऑस्ट्रेलियाने माजी कर्णधार स्टीव्हन स्मिथला संघात समाविष्ट केले आहे. वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड संघाचा भाग होता. मात्र दुखापतीमुळे तो स्पर्धेत खेळू शकणार नाही हे स्पष्ट झाले. हेझलवूडच्या ऐवजी स्मिथला संघात संधी मिळाली आहे. स्मिथने ऑस्ट्रेलियासाठी शेवटचा टी २० सामना फेब्रुवारी २०२४ मध्ये खेळला आहे. पण नुकत्याच झालेल्या बिग बॅश स्पर्धेत स्मिथने सिडनी सिक्सर्स संघाकडून खेळताना ६ सामन्यात १६७च्या स्ट्राईकरेटने २९९ धावा केल्या आहेत. दुखापतीमुळे कर्णधार मिचेल मार्श दोन लढती खेळू शकलेला नाही. उर्वरित सामन्यात तो खेळू शकेल का याविषयी साशंकता आहे. मार्शला पर्याय म्हणून स्टीव्हन स्मिथला श्रीलंकेत पाचारण करण्यात आले होते. झिम्बाब्वेविरुद्धच्या लढतीपूर्वी स्मिथ श्रीलंकेत दाखल होऊ शकला नाही. मात्र त्यानंतर काही तासात तो दाखल झाला आहे.सलामीच्या लढतीत मिचेल मार्श खेळला नाही. टीम डेव्हिड

## निसांकाने हवेत उंच उडी घेत टिपला आजवर कधीही न पाहिलेला झेल

**नवी दिल्ली:** ऑस्ट्रेलिया आणि श्रीलंका यांच्यातील सामन्यात पथुम निसांकाचा झेल पाहून सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. ज्याचा व्हीडिओ आता व्हायरल होत आहे. झरींहीं छळींीरपझ्र डींीपपळपस उरींलह तळवशे: श्रीलंकेचा स्फोटक फलंदाज पथुम निसांकाने श्रीलंका आणि ऑस्ट्रेलियाविरूद्ध सामन्यात सर्वांना आश्चर्यचकित करणारा झेल टिपला. टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये सुपर-८च्या दृष्टीने महत्त्वाचा सामना श्रीलंका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात खेळवला जात आहे. या साम न्यात ऑस्ट्रेलियाने वादळी सुरूवात केली. पण श्रीलंकेने कमालीचं पुनरागमन केलं. यादरम्यान निसांकाने झेल पाहून डोळ्यांवर विश्वास बसणार नाही. ज्याचा व्हीडिओदेखील व्हायरल होत आहे.




पल्लेकल्लेच्या इंटरनॅशनल स्टेडियमवर श्रीलंका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील सामन्याची नाणेफेक यजमान संघाने जिंकत कांगारू संघाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. दुखापतीनंतर परतलेल्या मिचेल मार्शने वादळी फलंदाजी केली. तर ट्रॅव्हिस हेडदेखील फॉर्मात परतला. या दोघांनी पहिल्या विकेटसाठी १०४ धावांची भागीदारी रचली. तर मार्श-हेड अनुक्रमे ५४ व ५६ धावा करत बाद झाले. पण पुढच्याच षटकात हेमंताच्या षटकात तो झेलबाद झाला.

**हेड-मार्शच्या वादळी सुरूवात**

**कॅमेरून ग्रीन ३ धावा तर टीम डेव्हिड ६ धावा करत झेलबाद झाले. यानंतर ग्लेन मॅक्सवेल व जोश इंग्लिस यांनी संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. ग्लेन मॅक्सवेल मैदानावर सेट झाल्यानंतर त्याने एका षटकात चौकार-षटकार लगावले.**

ग्लेन मॅक्सवेलचा पथुम निसांकाने कमालीचा झेल टिपत सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. सर्वच जण निसांकाचा झेल पाहून डोळे विस्फारत पाहत राहिले. हवेत उडत त्याने हा अनपेक्षित झेल टिपला.

निसांकाने टिपलेला झेल पाहून डोळ्यांवर बसणार नाही विश्वास दुष्मंता हेमंता १७व्या षटकात गोलंदाजी करत होता. मॅक्सवेल पहिल्याच चेंडूवर स्ट्राईकवर होता. तो खाली गुडघ्यावर बसत रिव्हर्स स्वीप मारायला गेला आणि चेंडू बॅकवर्ड पॉईंटच्या दिशेने हवेत गेला. चौकारासाठी जाणारा चेंडू पाहताच मागच्या दिशेने निसांकाने हवेत उडी घेतली आणि अनपेक्षित

## झिम्बाब्वेपाठोपाठ श्रीलंकेकडूनही पराभूत; निसांकाचे चमकदार शतक

### ऑस्ट्रेलियाचे आव्हान धोक्यात

पालेकेले येथे झालेल्या टी-२० विश्वचषक सामन्यात श्रीलंकेने ऑस्ट्रेलियाचा ८ गडी राखून धुव्वा उडवला. सलामीवीर पथुम निसांकाच्या (नाबाद १००) ऐतिहासिक शतकामुळे श्रीलंकेने १८२ धावांचे आव्हान १८ षटकातच पूर्ण केले. या पराभवामुळे ऑस्ट्रेलियाचे स्पर्धेतील आव्हान आता धोक्यात आले असून श्रीलंकेने मअव्वल आठफ फेरीत प्रवेश निश्चित केला आहे.

पालेकेले: पथुम निसांकाचे वादळी शतक! ऑस्ट्रेलियाचा पराभव करत श्रीलंका मसुपर ८फ मध्ये दाखल; कांगारूंच्या भवितव्याचा फैसला आता झिम्बाब्वे-आयर्लंड साम न्यावर. (संग्रहित छायाचित्र)

पीटीआय, पालेकेले - झिम्बाब्वेपाठोपाठ श्रीलंकेकडून पराभव पत्करावा लागल्याने ऑस्ट्रेलियाचे ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील आव्हान धोक्यात आले आहे. दुशान हेमंताच्या (३७ धावांत ३ बळी) प्रभावी गोलंदाजीनंतर सलामीवीर पथुम निसांकाच्या (५२ चेंडूंत नाबाद १००) आक्रमक शतकी खेळीच्या जोरावर श्रीलंकेने ङ्गबफ गटाच्या सामन्यात सोमवारी ऑस्ट्रेलियावर आठ गडी आणि १२ चेंडू राखून विजय मिळवला. या विजयामुळे श्रीलंकेचे ङ्गअव्वल आठफ फेरीतील स्थान निश्चित झाले असून ऑस्ट्रेलियाला आता इतर संघांच्या निकालावर अवलंबून रहावे लागेल.

ऑस्ट्रेलियाने दिलेल्या १८२ धावांच्या



**सामनावीर : पथुम निसांका**

२ ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत शतकी खेळी करणारा पथुम निसांका श्रीलंकेचा दुसरा फलंदाज. यापूर्वी २०१० मध्ये महेला जयवर्धनेचे शतक. १८२ ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत धावांचा यशस्वी पाठलाग करताना श्रीलंकेच्या आतापर्यंत सर्वाधिक धावा. ऑस्ट्रेलियाविरुद्ध देखील सर्वोच्च धावसंख्येचा यशस्वी पाठलाग. ९७ कुसाल मेंडिसचे ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये श्रीलंकेकडून सर्वाधिक ९७ षटकार. यापूर्वी दसुन शनाकाचे नावे ९६.

आव्हानाचा पाठलाग करणार्या श्रीलंकेची सुरुवात चांगली झाली नाही. कुसाल परेराच्या (१) रुपात संघाला पहिला धक्का बसला. यानंतर मात्र निसांका व कुसाल मेंडिस (३८ चेंडूंत ५१ धावा) यांनी संघाचा डाव साव-रला. दोघांनी मिळून दुसर्याम गड्यासाठी ९७ धावांची भागीदारी रचत संघाला शंभरी गाठून दिली. मार्कस स्टोइनिसने मेंडिसला बाद करीत ही भागीदारी मोडीत काढली. त्याने आपल्या खेळीत सहा चौकार व एक षटकार लगावला. दुसर्या बाजूने निसांकाने संघाची धावगती कमी होणार याची काळजी घेतली. निसांकाने यानंतर पवन रत्नायके (१५ चेंडूंत नाबाद २८) याच्यासह ७९ धावांची अभेद्य भागीदारी रचत श्रीलंकेला १८ षटकातच विजय मिळवून दिला. निसांकाने आपल्या खेळीत १० चौकार व पाच षटकारांची आतषबाजी केली. ऑस्ट्रेलियाकडून मार्कस स्टोइनिस (२/४६) वगळता कोणत्याही गोलंदाजाला चमक दाखवता आली नाही. ऑस्ट्रेलियाने क्षेत्ररक्षणही ढिसाळ केले.

त्यापूर्वी, प्रथम फलंदाजी करणार्या ऑस्ट्रेलियाने आक्रमक सुरुवात केली. सलामीवीर कर्णधार मिचेल मार्श (५४) आणि ट्रॅव्हिस हेड (५६) यांनी पहिल्या गड्यासाठी १०४ धावांची भागीदारी केली.

## अफगाणिस्तानने संयुक्त अरब अमीरातला दाखविले आसमान

**नवी दिल्ली**-मुख्य गोलंदाज अझमतुल्ला ओमरझाईने चार षटकात अवघ्या १५ धावांमध्ये घेतलेले चार बळी व इब्राहिम झद्रान आणि सलामीवीर इब्राहिम झद्रानच्या ४१ चेंडूतील ५३ धावांची अर्धशतकी खेळी व त्यास इतर फलंदाजांनी दिलेली साथ यामुळे अफगाणिस्तानने संयुक्त अरब अमीरातचा पाच विकेट राखून विजय मिळविला. विजयासाठी १६१ धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या अफगाणिस्तानचा सलामीवीर रहमानउल्ला गुरबाज हा डावातील दुसऱ्याच चेंडूवर शून्यावर बाद झाला. त्यानंतर दुसरा सलामीवीर इब्राहिम झद्रानने ४१ चेंडूत ५३ धावा करत संघाच्या धावसंख्येला आकार दिला. वनडाऊन खेळण्यासाठी आलेल्या गुलबदीन नायबने १२ चेंडूत १३ धावा करत दुसऱ्या विकेटसाठी ४० धावांच्या भागिदारीत आपले योगदान दिले. त्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या सेदिकुल्ला अटलने १४ चेंडूत १६ धावा, दारविश रसूलने २३ चेंडूत ३३ धावा आणि अझमतुल्ला ओमरझाईने २१ चेंडूत नाबाद ४० धावा करत संघाला विजय मिळवून दिला. मोहम्मद नबी ३ धावांवर नाबाद राहिला. अमीरातीकडून जुनैद सिद्दीकीने २३ धावांत दोन बळी, मुहम्मद अरफानने ३० धावांत दोन बळी, मुहम्मद जवादुल्लाने ३९ धावांत एक बळी घेतला.संयुक्त अरब अमीरातने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांमध्ये ९ बळी गमावत प्रति षटकामागे आठ धावांच्या सरासरीने १६० धावा केल्या. अवघ्या १३ धावांमध्ये संयुक्त अरब अमीरातचे दोन्ही सलामीवीर बाद झाल्याने शंभरच्या आत डाव संपणार असल्याची चिन्हे निर्माण झाली होती. संघाचा यष्टीरक्षक अस-लेला सलामीवीर आर्याश शर्मा हा शून्यावर तर दुसरा सलामीवीर कर्णधार मुहम्मद वसीम हादेखील शून्यावर बाद झाला. त्यानंतर तिसऱ्या विकेटसाठी अलिशान शराफू आणि सोहेब खान यांनी ८४ धावांची भागिदारी करत संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. अलिशान शराफूने ३१ चेंडूमध्ये ४० धावा तर सोहेब खानने ४८ चेंडूमध्ये ६८ धावा करत संघाची पडझड रोखण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर अमीरातची फलंदाजी गडगडली व ठराविक अंतराने विकेट पडत गेल्या. केवळ सय्यद हैदर (१३ धावा)आणि हैदर अलीच्या (१३ धावांचा) अपवाद वगळता अमीरातीच्या एकाही फलंदाजाला दोन आकडी धावसंख्या गाठता आली नाही. मुजीब उर रहमानने ३१ धावांत दोन बळी तर रशीद खानने २४ धावांत एक बळी घेत अमीरातीच्या

## आता वैभव सूर्यवंशी १० वीची परीक्षा देणार ?

मुंबई-भारतीय क्रिकेटमधील उदयोन्मुख खेळाडू आणि अवघ्या १४ व्या वर्षी चर्चेत आलेला वैभव सूर्यवंशी याच्याबाबत एक बातमी समोर आली आहे. शैक्षणिक वर्षअखेर होणारी (उइडए) दहावीची परीक्षा तो यंदा देणार की नाही याविषयी त्याच्या वडिलांनी उत्तर दिलं आहे. काही दिवसांपासून एक हॉल तिकीट सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. परीक्षा केंद्रावर सुरक्षेची तयारी वाढवल्याच्या चर्चाही रंगल्या होत्या. मात्र, शाळा प्रशासनाने कोणतीही विशेष सवलत दिली जाणार नसल्याचे आधीच स्पष्ट केले आहे. बिहारमधील ताजपूर येथे राहण-ारा वैभव ताजपूर येथील मॉडेस्टी स्कूलचा विद्यार्थी आहे परी-क्षेचा अर्जही त्याने भरला होता. परंतु तो सध्या सराव शिबिरे, राष्ट्रीय स्तरावरील सामने आणि

## इतिहासात पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियावर तोंड लपवायची वेळ!

कोलंबो-८.३ ओव्हरमध्ये १०४ रनची ओपनिंग पार्टनरशीप केल्यानंतर कोणतीही टीम २० ओव्हरमध्ये २०० रनचा टप्पा सहज गाठेल, असं कोणालाही वाटेल पण ऑस्ट्रेलियासारख्या बलाढ्य टीमला मात्र एवढ्या चांगल्या सुरूवातीनंतर धक्का बसला आहे. श्रीलंकेविरुद्धच्या टी-२० वर्ल्ड कपच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा १८१ रनवर ऑल आऊट झाला आहे. याचसोबत ऑस्ट्रेलियाच्या नावावर लाजिरवाणा विक्रम झाला आहे.

झिम्बाब्वेविरुद्धच्या सामन्यात पराभव झाल्यानंतर ऑस्ट्रेलियासाठी श्रीलंकेविरुद्धचा हा सामना जिंकणं गरजेचं आहे. सुपर-८ मध्ये प्रवेश करण्यासाठी ऑस्ट्रेलियाला हा सामना जिंकावा ला-गणार आहे. करो या मरो साठी उतरलेल्या ऑस्ट्रेलियाला ट्रेविस हेड आणि मिचेल मार्श यांनी वादळी सुरूवात करून दिली. या दोघांमध्ये ८.३ ओव्हरमध्येच १०४ रनची पार्टनरशीप झाली. ट्रॅविस हेडने २९ बॉलमध्ये ५६ आणि मिचेल मार्शने २७ बॉलमध्ये ५४ रनची खेळी केली, पण या दोघांच्या विकेट गेल्यानंतर ऑस्ट्रेलियाची बॅटिंग गडगडली.जॉश इंग्लिसने २७ आणि ग्लेन मॅक्सवेलने २२ रन केले. श्रीलंकेकडून दुशन हेमंताने सर्वाधिक ३ विकेट घेतल्या, याशिवाय दुष्मंता चमिराला २ विकेट मिळाल्या. महीश तीक्षणा, दुनीथ वेलालागे आणि कामिंदू मेंडिस यांना १-१ विकेट घेण्यात यश आलं.

टी-२० वर्ल्ड कपच्या इतिहासात पहिल्यांदाच १०० पेक्षा जास्त रनची ओपनिंग पार्टनरशीप झाल्यानंतर एखादी टीम ऑलआऊट झाली आहे. तर टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासात चौथ्यांदा हा नकोसा रेकॉर्ड झाला आहे. याशिवाय आयसीसीच्या पूर्ण सदस्य देशाचा १०० रनची ओपनिंग पार्टनरशीप झाल्यानंतर ऑलआऊट होण्याची ही दुसरी वेळ आहे, याआधी २०२४ साली मिरपूरमध्ये झिम्बाब्वेविरुद्ध बांगलादेशचा १४३ रनवर

# टी-२० विश्वचषक: इंग्लंडचा इटलीवर २४ धावांनी दमदार विजय

नवी दिल्ली-ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेच्या सुपर ८ मध्येप्रवेश करणारा इंग्लंड हा चौथा संघ ठरला आहे. क गटातून वेस्ट इंडिजने आधीच पुढच्या फेरीत प्रवेश निश्चित केला होता आणि इंग्लंडने सोमवारी इटलीवर विजय मिळवून आगेकूच केली. पहिलाच वर्ल्ड कप खेळणाऱ्या इटलीने त्यांच्या प्रदर्शनाने क्रिकेट चाहत्यांचे मन मात्र जिंकले. नेप-ाळला पराभूत केल्यानंतर इटलीचा आत्मविश्वास कमालिचा वाढलेला पाहायला मिळाला. त्यामुळेच समोर २०३ धावांचे आव्हानात्मक लक्ष्य असूनही हा संघ डगमगला नाही. शेवटपर्यंत त्यांनी विजयासाठी जोर लावला, परंतु इंग्लंडचा अनुभव कामी आला व २४ धावांनी इटलीचा संघ पराभूत झाला.

क गटातून सुपर ८ चे स्थान निश्चित करण्यासाठी मैदानावर उतरलेल्या इंग्लंडला कोलकाताच्या इडन गार्डनवर इटलीने जेरीस आणले हो-ते. फुटबॉलच्या मैदानावर या दोन्ही देशांमधील लढती रोमहर्षक राहिल्या आहेत आणि क्रिकेटच्या मैदानावर तिच ठसन पाहायला मिळाली. नेप-ाळला पराभूत करून वर्ल्ड कपम धील पहिला विजय मिळवल्यानंतर इटलीचा आत्मविश्वास किती वाढलाय, हे इंग्लंडविरुद्ध पाहायला मिळाला. इंग्लंडचा निम्मा संघ त्यांनी १०५ धावांत तंबूत पाठवला होता.

जॉस बटलर ( ३), जेकब बेथेल ( २३), फिल सॉल्ट ( २८), कर्णधार हॅरी ब्रूक ( १४) व टॉम बँटन ( ३०) यांना इटलीच्या गोलंदाजांनी शांत ठेवले. पण, सातव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या विल जॅक्सने सामना ३६० डिग्री कोनात फिरवला.



त्याने २१ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले, जे ट्वेंटी-२० वर्ल्ड कपम धील इंग्लंडकडून झालेले वेगवान अर्धशतक ठरले. त्याने इयॉन मॉर्गनचा विक्रम मोडला. जॅक्सने २२ चेंडूंत ३ चौकार व ४ षटकारांसह नाबाद ५३ धावा करताना संघाला ७ बाद २०२ धावांपर्यंत पोहोचवले.

इटलीच्या ग्रांट स्टीवर्ट व क्रिशन कलनगामागे यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. इटलीची सुरुव-ात काही खास झाली नाही. जोफ्रा आर्चरने पहिल्याच षटकात अँथोनी म ोस्का ( ०) व जेजे स्मट्स ( ०) यांना बाद केले. त्यानंतर जेमी ओव्हरटनने कर्णधार हॅरी मॅनेटीला ( १२) माघ-ारी पाठवून इटलीची अवस्था ३ बाद २२ अशी केली. आता इथून इटली काय डोकं वर काढत नाही, असे इंग्लंडला वाटले. पण, जस्टीन मोस्का व बेन मॅनेटी ही जोडी मैदानावर उभी राहिली.बेनने २२ चेंडूंत अर्धशतक ठोकले आणि इडन गार्डनचे सर्व कोपरे चौकार-षटकारांनी व्यापले. विल जॅक्सने टाकलेल्या १२ व्या षटकात मॅनेटीने ४,६,६,४ असे फटके खेचले. पण, शेवटच्या चेंडूवर मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नान मॅनेटी झेलबाद झाला. त्याने २५ चेंडूंत ४ चौकार व ६ षटकारांसह ६० धावांची वादळी खेळी केली. मोस्का व मॅनेटी जोडीने पाचव्या विकेटसाठी ४८ चेंडूंत ९२ धावा जोडल्या. या दोघांनी इंग्लंडच्या नाकी नऊ आणले होते. मोस्काने इंग्लंडच्या गोलंदाजांना चांगला चोप दिला, परंतु आदिल राशिदच्या गोलंदाजीवर तो फसला. मोस्का ३४ चेंडूंत ७ चौकारांसह ४३ धावांवर बाद झाला.

इटलीला ३० चेंडूंत ६१ धावा हव्या होत्या आणि इंग्लंडने शेवटच्या पाच षटकांतच ७१ धावा चोपल्या होत्या. त्यामुळे इटलीसाठीही हे लक्ष्य शक्य होते. पण, सॅम कुरनने एकाच षटकात त्यांना दोन धक्के दिले. मार्कस कॅम्पोपियानो ( २) व जिएय-पिएरो मीड ( ०) हे बाद झाले. १८व्या षटकात ग्रांट स्टीवर्टने २१ धावा कुटल्या आणि सामना १२ चेंडूंत ३० धावा असा जवळ आणला. सॅम करन पुन्हा एकदा इंग्लंडसाठी संकटमोचक ठरला. त्याने १९ व्या षटकात फक्त ५ धावा देत १ विकेट घेतली. स्टीवर्ट २३ चेंडूंत २ चौकार व ५ षटकारांसह ४५ धावांची खेळी केली. करनने २३

# जयपूरहून सुरु होणार एआय किसान क्रांती: केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान लाँच करणार "भारत-VISTAAR"

## एआयशी जोडले जाणार शेती-शेतकरी: शिवराज सिंह यांच्या नेतृत्वाखाली १७ फेब्रुवारीला भारत-VISTAAR ची सुरुवात

## मौसम, बाजारभाव, योजना एका कॉलवर: भारत-VISTAAR मुळे शेतकऱ्यांना २४x७ स्मार्ट मदत – शिवराज सिंह

**नवी दिल्ली / जयपूर:** केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण तसेच ग्रामीण विकास मंत्री श्री शिवराज सिंह चौहान १७ फेब्रुवारी रोजी राजस्थान दौऱ्यावर राहणार असून जयपूर येथे देशभरातील शेतकऱ्यांसाठी भारत-VISTAAR हा नवा डिजिटल साथी लाँच करणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय शेती आणि शेतकऱ्यांना अधिक सक्षम करण्यासाठी तयार केलेले हे एआय-आधारित प्लॅटफॉर्म फोन कॉल, चॅटबॉट आणि पुढे मोबाईल ॲपच्या माध्यमातून हवामान, बाजारभाव, कीड-रोग, मृदा, पीक सल्ला आणि शासकीय योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देईल. पहिल्या टप्प्यात ही सेवा हिंदी व इंग्रजी भाषेत सुरू होणार असून महाराष्ट्र, बिहार आणि गुजरातसह अनेक राज्यांतील लाखो शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल. लाँच कार्यक्रमात राज्यांचे कृषिमंत्री तसेच खउ-ठ, कृषी विज्ञान केंद्रे आणि कृषी विद्यापीठांच्या नेटवर्कद्वारे देशभरातील लाखो शेतकरी ऑनलाइन सहभागी होतील.

**राजस्थानचे मुख्यमंत्रीही उपस्थित**

जयपूर येथे १७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता होणाऱ्या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यासोबत राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, केंद्रीय कृषी राज्यमंत्री भागीरथ चौधरी, रामनाथ ठाकुर, राज्याचे कृषिमंत्री किरोड़ी लाल मीणा, खासदार-आमदार व इतर जनप्रतिनिधी तसेच मंत्रालयाचे सचिव डॉ. देवेश चतुर्वेदी आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहतील.

**एआय फॉर एग्रीकल्चर रोडमॅप, एआय हॅकाथॉन व एग्रीकोष**

या प्रसंगी केंद्रीय मंत्री आणि मुख्यमंत्री यांच्या हस्ते एआय फॉर एग्रीकल्चर रोडमॅपचे अनावरण होईल तसेच एआय हॅकाथॉन व एग्रीकोष यांची घोषणाही केली जाईल.

**भारत-VISTAAR: डिजिटल क्रांती**

भारत-VISTAAR हे केंद्र सरकारचे शेतकरी-केंद्रित, एआय-संचालित डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर असून विविध सरकारी व वैज्ञानिक स्रोत एकत्र जोडून शेतकऱ्यांना विश्वासार्ह माहिती पुरवेल. या प्लॅटफॉर्मवर हवामान, बाजारभाव, कीड-रोग, मृदा आरोग्य, पीक व्यवस्थापन आणि किमान दहा केंद्र सरकार योजनांची माहिती व स्थिती पाहता येईल.

**व्हॉइस-फर्स्ट एआय: साध्या फोनवरही सुविधा**

हे प्लॅटफॉर्म व्हॉइस-फर्स्ट एआय तंत्रावर तयार करण्यात आले असून साधा फीचर फोन वापरणारा शेतकरीही फक्त कॉल करून सेवा घेऊ शकतो. यासाठी १५५२६१ ही टेलिफोनी हेल्पलाईन जोडण्यात आली आहे. व्हॉइस इनपुट-आउटपुट, वेबसाइट, मोबाईल साइट चॅटबॉट तसेच अँड्रॉइड ॲपची सुविधाही उपलब्ध होणार आहे.

**हवामान, बाजारभाव व योजनांचा एकत्रित उपाय**

पहिल्या टप्प्यात भारत-VISTAARमध्ये खचऊ कडील हवामान माहिती, AgMarkNet मधील बाजारभाव, NPSS मार्फत कीड-रोग व्यवस्थापन, एग्री-स्टॅक डेटा व १० केंद्र योजनांची माहिती जोडण्यात आली आहे. शेतकऱ्यांना अर्ज स्थिती, लाभ ट्रॅकिंग आणि तक्रार नोंदविण्याची सुविधाही यात आहे.

**डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर म्हणून रचना**

भारत-VISTAAR हे कृषी क्षेत्रासाठी खास तयार केलेले एआय-आधारित डीपीआय असून प्लग-अँड-प्ले मॉडेलवर कार्य करेल. त्यामुळे विविध सरकारी, वैज्ञानिक व बाजारव्यवस्था सहज जोडता येतील. सुरक्षित, सत्यापित माहिती, बहुभाषिक सुविधा आणि राज्यांना स्वतंत्रपणे स्वीकारता येईल अशी रचना यात आहे.

**राज्यांशी जोडणी व विस्तार**

फेज-१ मध्ये महाराष्ट्र, बिहार व गुजरात या राज्यांना प्लॅटफॉर्मशी जोडण्यात आले असून पुढे इतर राज्ये व अधिक भारतीय भाषा जोडून राष्ट्रीय स्तरावर डिजिटल कृषी नेटवर्क तयार करण्याचा उद्देश आहे.

**वैज्ञानिक सल्ल्याचे मजबूत जाळे**

भारत-VISTAAR मध्ये भारतीय कृषी अनुसंधान परिषद यांच्या पीक व्यवस्थापन मार्गदर्शक सूचना व मृदा आरोग्य कार्डावर आधारित सल्ला समाविष्ट आहे.

त्यामुळे हा प्लॅटफॉर्म केवळ माहितीपुरता न राहता शेतकऱ्यांसाठी डिजिटल कृषी सल्लागार ठरणार आहे. हा ऐतिहासिक लाँच कार्यक्रम जयपूर येथील स्टेट इन्स्टिट्यूट ऑफ ॲग्रीकल्चर मॅनेजमेंट, दुर्गापुरा येथे होणार आहे.

## सॅमसंगच्या गॅलेक्सी अनपॅकचे २५ फेब्रुवारी रोजी आयोजन; आगामी एआय फोन जीवन अधिक सोपे करणार

SAMSUNG

**मुंबई/प्रतिनिधी :** Samsung Electronics कंपनीतर्फे २५ फेब्रुवारी रोजी San Francisco येथे 'गॅलेक्सी अनपॅक २०२६' या बहुप्रतिक्षित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात कंपनी आपल्या नव्या गॅलेक्सी एस सिरीजचे अनावरण करणार आहे. अत्याधुनिक एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञानावर आधारित हे स्मार्टफोन वापरकर्त्यांचे दैनंदिन जीवन अधिक सोपे आणि कार्यक्षम करण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहेत.

दररोजच्या कामांमध्ये येणाऱ्या अडचणी दूर करून अधिक स्मार्ट आणि वैयक्तिकृत मोबाइल अनुभव देण्यावर या नव्या गॅलेक्सी एस सिरीजचा भर असणार आहे. संवाद अधिक सुलभ करणे, आत्मविश्र्वास वाढवणे आणि 'गॅलेक्सी एआय'चा प्रभावी अनुभव देणे हे या मालिकेचे प्रमुख वैशिष्ट्य असेल.

या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण २५ फेब्रुवारी रोजी भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री ११.३० वाजता Samsung.com, सॅमसंग न्यूज रूम इंडिया तसेच सॅमसंगच्या अधिकृत यूट्यूब चॅनेलवर केले जाणार आहे. गॅलेक्सी अनपॅक २०२६पूर्वी प्रदर्शित होणारे सर्व टीझर्स, ट्रेलर्स, अपडेट्स आणि विशेष ऑफर्सची माहिती मिळवण्यासाठी इच्छुकांनी samsung.com/unpacked या संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे आवाहन कंपनीतर्फे करण्यात आले आहे.

एआयच्या नव्या युगाची सुरुवात करणाऱ्या या कार्यक्रमाकडे तंत्रज्ञानप्रेमींचे लक्ष लागले आहे.

# नवोदय विद्यालयातील अनुष्का पाटोळे प्रकरण तापले; लातूरात महा आक्रोश मोर्चा, जिल्हाधिकाऱ्यांवर संताप

लातूर /प्रतिनिधी : शहरातील साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौकातून निघालेल्या सकल मातंग समाजाच्या महा आक्रोश मोर्चाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. नवोदय विद्यालयातील विद्यार्थिनी अनुष्का पाटोळे हिच्या मृत्यू प्रकरणात प्रशासनाच्या भूमिकेविरोधात मोर्चेकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. या वेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या कार्यपद्धतीवर घोषणाबाजी करत निषेध नोंदविण्यात आला.

मोर्चामध्ये अनुष्काच्या आईने भावनिक आक्रोश व्यक्त करत मुलीने आत्महत्या केली नसून तिचा खून झाल्याचा आरोप केला. अनुष्काला न्याय मिळावा, प्रकरणाची आत्महत्येकडे वळवणारी भूमिका थांबवावी आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशा मागण्यांनी परिसर दणाणून गेला. चार लाखांचा निधी दिल्याचे प्रशासनाचे विधान खोटे असल्याचाही आरोप करण्यात आला.




या मोर्चात जिल्ह्यातील व राज्यातून दलित समाजाच्या डेमोक्रेटिक पार्टी ऑफ इंडिया, वंचित बहुजन आघाडी, लोकनायक सामाजिक संघटना, एबीएस फोर्स, लहुजी शक्ती सेना, महाराष्ट्र युवाशक्ती सेना, भीम आर्मी संघटना, वारणेचा वाघ मित्र मंडळ, युवा भिमसेना सोलापूर, विद्रोही संघटना, आधुनिक लहुजी सेना, भीम अण्णा सामाजिक संघटना, आर के ग्रुप, एकता ऑटो इंडियन सारख्या अनेक संघटना व संघटनेचे पदाधिकारी अजिंक्य चांदणे, गणपत भिसे, नगीनाताई कांबले, महेश डोलारे, गणपत भिसे, सुनिल सौदागर, पिराजी साठे, विकास कांबळे, महादुभाऊ रसाळ, सचिंद्र कांबळे, शाम च्हाण, सुनिल बसपुरे, नुतन हनमंते, आश्विन कांबळे, महादेव मस्के, राजेंद्र लोदगेकर,राहुल क्षिरसागर,राज क्षिरसागर, आशोक मगर, विजय लोढे, रवी कदम, रवी शिदे, नागेश क्षिरसागर, रवी अर्जुने अनुष्का पाटोळेचे आई-वडील व नातेवाईक यांची उपस्थिती होती.मोर्चामध्ये न्याय मिळेपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

कुटुंबीयांच्या मते, अनुष्काच्या मृत्यूला आत्महत्या म्हणण्यासाठी कोणताही ठोस पुरावा नसून तिच्या हाताला झालेला फ्रॅक्चर, तळव्यांवरील काळे-निळे डाग आणि डोक्यावरील जखम यावरून तिला मारहाण करून हत्या करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. पोलिसांनी तपासाची दिशा बदलून खुनाच्या अनुषंगाने चौकशी करावी, अशी जोरदार मागणी मोर्चात करण्यात आली.

मोर्चेकऱ्यांनी प्रशासनाकडे विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. त्यामध्ये माजी न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली निष्पक्ष चौकशी समिती स्थापन करणे, प्रकरण फास्टट्रॅक न्यायालयात चालवणे, संबंधित पदाधिकाऱ्यांची चौकशी करून आरोपींवर कठोर कारवाई करणे, एसआयटी प्रमुख तपास अधिकारी बदलणे, मोबाईल सीडीआर तपासणे, अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करणे आणि दोषींना कठोर शिक्षा देणे या प्रमुख मागण्यांचा समावेश आहे. मोर्चाचे नेतृत्व माजी नगरसेवक जी. ए. गायकवाड आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुरेश चव्हाण यांनी केले. आंदोलन शांततेत पार पडले असले तरी अनुष्का पाटोळे प्रकरणात न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरू राहणार असल्याचा इशारा आंदोलकांनी दिला.

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे मेगा रक्तदान शिबिर संपन्न

लातूर प्रतिनिधी : ''रक्त हेच जीवन'' या विचाराची प्रचिती देणारे मेगा रक्तदान शिबिर दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर येथे उत्साहात पार पडले. दयानंद शिक्षण संस्था व संस्थेशी संलग्नित आठ महाविद्यालये तसेच एम.व्ही.पी.एम. एलुमनी पुणे यांच्या संयुक्त पुढाकारातून सोमवार,दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

मानवी जीवनासाठी रक्त हे अमूल्य द्रव्य असून अपघात, शस्त्रक्रिया, प्रसूती, थॅलेसेमिया व इतर गंभीर आजारांमध्ये रक्ताची तातडीची गरज भासते. कृत्रिमरीत्या रक्ताची निर्मिती शक्य नसल्याने रक्तदान हाच एकमेव पर्याय आहे. ''रक्तदान हीच सर्वश्रेष्ठ मानवसेवा'' या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांनी,प्राध्यापकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे उद्घाटन दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी संस्थेचे सचिव रमेशजी बियाणी, सहसचिव विशाल लाहोटी,सदस्य चैतन्यजी भार्गव,सदस्य सागर मंत्री,डॉ. भालचंद्र ब्लड सेंटर चे पदाधिकारी नितीन भराडिया,श्रीकांत करवा उपस्थित होते. संस्थेशी संलग्नित विविध महाविद्यालयांचे प्राचार्य डॉ. क्रांती सातपुते, डॉ.पुनम नाथानी,डॉ.सिद्रेश्वर बेल्लाळे,डॉ. वाजीद चाउस यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

हे शिबिर इंडियन रेड क्रॉस सोसायटी द्वारा संचलित डॉ. भालचंद्र ब्लड सेंटर, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडले. विशेष आकर्षण ठरली ती अत्याधुनिक, वातानुकूलित व सुसज्ज चालती-फिरती रक्तदान व्हॅन.या व्हॅनमध्ये रक्तसंकलन, साठवणूक व तपासणीच्या सर्व आधुनिक सुविधा उपलब्ध असल्याने रक्तदात्यांना सुरक्षित व सुसज्ज वातावरणात रक्तदान करता आले.अनेक विद्यार्थ्यांनी प्रथमच अशा प्रकारच्या अत्याधुनिक सुविधेचा अनुभव घेत उत्साहाने रक्तदान केले.

# महिलाच्या आर्थिक सक्षमीकरणाला एआयची जोड मिळाल्यास त्यांचा शाश्वत विकास शक्य -विजया रहाटकर यांचा आशावाद

## 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट-२०२६'मध्ये महिला समृध्दीचा निर्धार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) हे केवळ एक तांत्रिक साधन नसून शिक्षण, प्रशासन आणि उद्योग क्षेत्राचा केंद्रबिंदू ठरत आहे. आगामी काळात एआयमुळे रोजगाराच्या संधी आणि स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलणार असून महिलांनी या तंत्राच्या केवळ 'वापरकर्त्या' म्हणून न राहता संशोधक आणि निर्माते होऊन नव्या परिवर्तनाचे नेतृत्व करावे. महिलाच्या आर्थिक सक्षमीकरणाला एआयची जोड मिळाल्यास त्यांचा शाश्वत विकास होउ शकेल असा आशावाद राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी आज येथे व्यक्त केला.

दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट'मध्ये आज दुपारी राष्ट्रीय महिला आयोग , आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटना आणि संयुक्त राष्ट्र प्रशिक्षण व संशोधन संस्था (युनिटार) या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने एआय आणि आर्थिक शक्ती – महिला नेतृत्वातील समृद्धीची रूपरेषा या विषयावर आयोजित विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समारोपीय भाषणात त्या बोलत होत्या. मंचावर युनिटारच्या संचालिका (समृद्धी विभाग) मिहोको कुमामोटो, आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघाच्या (आयटीयू) प्रादेशिक संचालिका (आशिया-पॅसिफिक) अत्सुको ओकुदा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह आणि संगीतकार निर्माता कार्तिक शाह उपस्थित होते.

या समिटमधील चर्चासत्र हा केवळ संवाद नसून ती एक चळवळ आहे. भारतीय महिलांनी नेहमीच परिवर्तनाचे नेतृत्व केले आहे, असा दाखला देऊन श्रीमती रहाटकर पुढे म्हणाल्या, एआय सारख्या नव्या तंत्रज्ञानातही महिला मागे राहणार नाहीत. त्यासाठी त्यांना अनुरुप प्रक्षिशण व योग्य अशी इको स्टिटीम दिली जाईल. महिलांची केवळ भागीदारी अपेक्षित नसून त्यांच्याकडे या तंत्राची मालकी आली पाहिजे. त्यासाठी महिलांना 'एआय साक्षरता' प्राप्त होणे अत्यावश्यक आहे. यामध्ये डेटा संरक्षण, डिजिटल नीतिमत्ता आणि सायबर सुरक्षेची सखोल समज आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. केवळ घोषणांऐवजी प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर देत सूक्ष्म व लघुउद्योगांना जागतिक पुरवठा साखळीशी जोडण्याचे आवाहन करुन राष्ट्रीय महिला आयोग त्यासाठी कृतीशील प्रयत्न करेल, असा विश्वास त्यांनी दिला.

या सत्रात श्री. ब्रिजेश सिंह यांनी महिलांना भेडसावणाऱ्या डिजिटल धोक्यांवर प्रकाश टाकला. एआयची निर्मिती प्रामुख्याने पुरुषप्रधान मजकूर आणि डेटाच्या आधारे झाल्याने त्यामध्ये संवेदनशीलता, न्याय आणि समतेचा अभाव दिसून येतो. ही प्रणाली केवळ कार्यक्षमतेच्या 'हायपर-ऑप्टिमायझेशन'वर लक्ष केंद्रित करते, ज्याचा विपरित परिणाम महिलांच्या सुरक्षिततेवर होत आहे. आकडेवारीनुसार, 'डीपफेक' तंत्रज्ञानाच्या ९१ टक्के बळी महिलाच आहेत, जे अत्यंत धक्कादायक आहे. महिलांविरोधात होणारे अत्याचार, डीपफेकसारखे प्रकार यावर निश्चित आणि प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी आपण काही बाबी नक्की करु शकतो. सोशल मीडिया कंपन्यांनी 'सेफ हार्बर' नियमांचा आधार घेत जबाबदारी झटकू नये, असे सांगत त्यांनी 'प्लॅटफॉर्म जबाबदारी'वर भर दिला. मुळात हा विषय प्लॅटफॉर्मच्या जबाबदारीचा आहे. जिथे प्लॅटफॉर्म जबाबदारी स्वीकारत नाहीत, तिथे सरकारने हस्तक्षेप करणं आवश्यक आहे. भारतामध्ये २०२१ मधील नियमांनुसार पीडित व्यक्तींना नोडल अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याची सुविधा आहे आणि ठराविक कालावधीत आक्षेपार्ह सामग्री हटविणे कंपन्यांना बंधनकारक आहे. तसेच एआय-निर्मित प्रतिमांवर 'वॉटरमार्क' सक्तीचे करण्याची गरजही त्यांनी यावेळी व्यक्त केली .

युनायटेड नेशन्स इन्स्टिट्यूट फॉर ट्रेनिंग अँड रिसर्चच्या मिहोको कुमामोटो यांनी आपले विचार मांडताना क्षमता बांधणी आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यावर भर दिला. यामुळे महिलांना एआय-आधारित जागतिक संधींचा लाभ घेता येईल. यामुळे महिलांचा सर्वांगीण विकास होईल असा विश्वास व्यक्त करुन त्या म्हणाल्या, युनीटारला भारत सरकार, राष्ट्रीय महिला आयोग, आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघ, तसेच इतर संयुक्त राष्ट्र भागीदारांसोबत व्यावहारिक समृध्दीसाठी एआय हे उदिष्ट ठेऊन पुढील कार्यक्रम अंमलात आणण्याची इच्छा आहे. हे कार्यक्रम स्थानिक वास्तवावर आधारित असतील, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला बळ देतील आणि इतर देशांना उपयोगी पडेल असे पुराव्यावर आधारित मॉडेल उभारतील. म्हणूनच, जेव्हा ग्लोबल साउथमधील कृत्रिम बुद्धिमत्तेची कथा लिहिली जाईल, तेव्हा महिलांचा उल्लेख तळटीपेत न राहता, सामायिक आणि सर्वसमावेशक समृद्धीच्या मुख्य अध्यायाच्या लेखिका म्हणून त्यांची नोंद होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



इंटरनॅशनल टेलिकम्युनिकेशन युनियनच्या अत्सुको ओकुडा यांनी द्वितीय आणि तृतीय शहरांमधील महिलांसाठी डिजिटल समावेशकता वाढवण्याची आणि डिजिटल दरी कमी करण्याची गरज अधोरेखित केली. एआय नवसंशोधनाचे रूपांतर महिलांच्या प्रत्यक्ष आर्थिक सक्षमीकरणात करण्यासाठी एक 'प्रॅक्टिकल रोडमॅप' तयार करण्याबाबत भारताने पुढाकार घ्यावा असेही सांगितले.

एआय संगीत निर्माते कार्तिक शाह यांनी सर्जनशील आणि डिजिटल अर्थव्यवस्थेत महिलांसाठी असलेल्या वाढत्या संधींबाबत यावेळी माहिती दिली. एआय मुळे कला क्षेत्रात होऊ शकणा-या बदलामुळे त्यांनी महिलांना या तंत्रामुळे पाठबळ लाभणार असल्याचे त्यांनी सांगितले. श्रीमती मिहोको कुमामोटो यांनी मॉडरेटर म्हणून सत्राची जबाबदारी स ा ा भ ा ळ ल ी .

सत्राच्या प्रारंभी महिला सक्षमीकरणाचा संदर्भ असलेली एआय वर आधारित चित्रफित दाखविण्यात आली. या सत्राचे संचालन सलोनी लखिया यांनी केले. श्रीमती आकांक्षा यांनी सहभागी वक्त्यांचा परिचय करुन दिला.

# शिवजन्मोत्सव समितीच्या बुध्दीबळ स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने शिवजयंतीनिमित्त रविवारी (दि.१५) घेण्यात आलेल्या बुध्दीबळ स्पर्धेस स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. १७५ स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवून बुध्दीबळ अन लातूरची जणू वेगळी ओळखच दिली. आर.एन मोटेगावकर विद्यालयात झालेल्या या स्पर्धेचे उदघाटन मोटेगावकर स्कुलच्या संचालिका मिनल मोटेगावर यांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमा पुजनाने व दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रध्दासुमने अर्पण करुन झाले. अध्यक्षस्थानी आरटीओ प्रमोद सरोदे होते. शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, ॲड. उदय गवारे, ॲड. शिवकुमार जाधव, डी.एस. पाटील, प्राचार्य नेताजी जाधव, बुध्दीबळ प्रशिक्षक श्रीराम साने, अविनाश देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.



मीनल मोटेगावकर यांनी महापुरुषांच्या जयंत्यांना सामाजिक बांधिलकीची जोड देत समिती घेत असलेले कार्यक्रम व राबवत असलेले उपक्रम दिशादर्शक असल्याचे सांगत खेळाडुंनीखिलाडू वृत्ती बाळगळी पाहीजे असे नमुद केले. श्रीराम साने यांनी विद्यार्थ्यांसाठी शिवजन्मोत्सव समिती राबवत असलेल्या उपक्रमाचे कौतूक करीत समितीप्रति कृतज्ञता व्यक्त केली. आरटीओ सरोदे यांनीही मनोगत व्यक्त केले. परिक्षक म्हणून श्रीराम साने, अमित बियाणी, अण्णासाहेब साठे, श्रीकांत मंत्री, विकी महेंद्रकर, पूजा शेळके यांनी काम पाहिले. प्रास्ताविक ॲड. उदय गवारे यांनी केले सुत्रसंचालन भीम दुनगावे यांनी केले. डी.एस. पाटील यांनी आभार मानले. सकाळी दहा वाजता सुरू झालेल्या स्पर्धा रात्री सात वाजेपर्यंत चालल्या. स्पर्धकांत खूप उत्साह होता.त्यांच्यासाठी त्यांच्या पालकांनीही दिवसभर स्पर्धास्थळी बैठक दिली होती.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# ढोकीत शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने 'स्मरणिका २०२५'चे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन



ढोकी(प्रतिनिधी)-ढोकी आपला कारभार पारदर्शक असावा या शिवछत्रपतींच्या शिकवणीचा वारसा जपत ढोकी येथील शिवजन्मोत्सव समितीने केवळ जमा-खर्चाचा हिशेबच नव्हे तर महाराजांच्या चरित्रातील प्रेरक पैलू 'स्मरणिका २०२५'च्या माध्यमातून जनतेसमोर मांडले आहेत. या स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवराच्या हस्ते करण्यात आले. शिवजन्मोत्सव सोहळा समिती, ढोकी यांच्याकडून शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त वार्षिक स्मरणिकेच्या प्रकाशन गुरुवारी (दि. १२) येथील आजोबा गणपती मंदिरासमोर करण्यात आले. शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने प्रकाशित स्मरणिका म्हणजे केवळ एक अहवाल नसून, तो एक सांस्कृतिक दस्तऐवज ठरला आहे. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी रचलेला अभंग, छत्रपती संभाजी महाराजांनी 'बुधभूषण' ग्रंथात केलेली शिवस्तुती, शिवरायांचे एक दुर्मिळ पत्र' यासारख्या विषयांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच कवी भूषणांची अजरामर कवने आणि शाहीर अज्ञानदास यांच्या संदर्भाने या स्मरणिकेची वाचनीयता वाढवली आहे. या प्रकाशन सोहळ्यास पंचायत समिती सदस्य अमर समुद्रे, उपसरपंच अमोल समुद्रे, बाजार समितीचे संचालक निहाल काझी, आंबेडकर कारखान्याचे संचालक आयुब पठाण, भारत देशमुख, झुंबर बोडके, प्रमोद देशमुख, ग्रामपंचायत सदस्य नहुषराज समुद्रे यांच्या उपस्थितीत प्रकाशन सोहळा संपन्न झाला. यावेळी सतीश तिवारी, दगडू धावारे, सतीश वाकुरे, अंकुश जाधव, राहुल पोरे, गुणवंत सुतार, राहुल वाकुरे, सिराज मुल्ला, तानाजी माळी, मनोज समुद्रे यांसह परिसरातील शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवजन्मोत्सव सोहळा समिती अध्यक्ष सागर घाडगे, उपाध्यक्ष संकेत लंगडे, खजिनदार पंकज देशपांडे यांच्यासह सर्व सदस्यांनी या स्मरणिकेच्या निर्मितीसाठी अथक परिश्रम घेतले. शिवजन्मोत्सव समितीच्या 'स्मरणिका २०२५' चे मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन केले. ढोकीचा इतिहास आणि सामाजिक कार्य ढोकी गावच्या आठव्या व दहाव्या शतकातील ऐतिहासिक पाऊलखुणा, पुरातन महादेव मंदिर आणि बालाजी मंदिराची दुर्मिळ माहिती व मूर्तींची छायाचित्रे या स्मरणिकेच्या मांडण्यात आले आहेत. वर्षभरात शिवजन्मोत्सव समितीने राबवलेले सामाजिक उपक्रम आणि गावातील २६ मान्यवरांचे अभ्यासपूर्ण अभिप्राय या स्मरणिकेत आहेत. शेवटच्या पानावर दिलेला ''शिवसंकल्प'' वाचकांचे लक्ष वेधून घेत आहे.

# ग्रामीण भागात ग्रंथालय चळवळ वाढायला पाहिजे - श्री.गजानन गाडेकर

धाराशिव,दि. १४ (जिमाका) आपणाला सर्व प्रकारचे ज्ञान मिळण्याचे ग्रंथ व साहित्य हे मुख्य साधन आहेत. ग्रामीण भाग हा वाचनाच्या चळवळीत पहिल्यापासूनच सक्रिय आहे. त्यांची सक्रियता अधिक तीव्र करण्यासाठी ग्रामीण भागात ग्रंथालय चळवळ जोमाने वाढायला पाहिजे,असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालनालयाचे संचालक अशोक गाडेकर यांनी आज १४ फेब्रुवारी रोजी केले.

वाशी शहरात आयोजित धाराशिव ग्रंथोत्सव - २०२५ अंतर्गत बाल वारकऱ्यांची ग्रंथ दिंडी काढण्यात आली.या दिंडीत विठ्ठल -रुक्मिणी, संत तुकाराम,संत मिराबाई यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराज,राजमाता जिजाऊ ,महात्मा गांधी,महात्मा ज्योतिबा फुले,माता सावित्रीबाई फुले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आदी महापुरुषांच्या वेशभूषेत साकारलेली मिरवणूक हे ग्रंथोत्सवाचे मुख्य आकर्षण ठरले.

वाशी येथील अजिंक्य विद्या मंदिर परिसरात महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, धाराशिव व तालुका ग्रंथालय संघ वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने या ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात आले.उद्घाटन प्रसंगी जिल्हा ग्रंथालयाचे अध्यक्ष व.ग.सुर्यवंशी अध्यक्षस्थानी होते.कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रा.डॉ. गजानन कोटेवार,वाशी नगर पंचायतच्या नगराध्यक्ष विद्याताई गायकवाड,छत्रपती संभाजीनगर येथील सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे,मराठवाडा विभागाचे प्रमुख कार्यवाहक राम मेकले,पुणे जिल्ह्याचे अध्यक्ष विनोद गायकवाड, अजिंक्य विद्या मंदिराचे संस्थापक अध्यक्ष एस.एल.पवार,जिल्हा ग्रंथालय अधिकारी हनुमान ढाकणे, निरीक्षक शिवशंकर कटाळे, सुधाकर बुकन आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना अशोक गाडेकर म्हणाले की,सोशल मीडियामुळे तरुण पिढीचा वाचनाकडे कल कमी होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे तालुकास्तरावर ग्रंथोत्सव साजरे करून सर्व प्रकारची पुस्तके मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ग्रंथोत्सवाच्या माध्यमातून वाचन संस्कृती जोपासण्याचे आणि वाढविण्याचे काम समाजाच्या हितासाठी व्हावे,असे त्यांनी आवाहन केले.

अध्यक्ष व.ग.सुर्यवंशी यांनी ग्रंथालयांमध्ये सर्व प्रकारची पुस्तके,विशेषतः स्पर्धा परीक्षांची पुस्तके उपलब्ध करून देण्याची गरज व्यक्त केली.वाचक चोखंदळ असावा आणि वाचकसंख्या वाढावी यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत,असे



त्यांनी सांगितले. छत्रपती संभाजीनगर येथील सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांनी सोशल मीडियाचे दुष्परिणाम तरुण पिढीसमोर मांडण्याची गरज व्यक्त केली. वाचनाच्या माध्यमातून पिढी घडते, तर सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. प्रा.डॉ. गजानन कोटेवार म्हणाले की, मी महात्मा गांधी यांना प्रत्यक्ष पाहिले नाही;मात्र ग्रंथांच्या माध्यमातून त्यांना आत्मसात केले. तरुणांना वाचनाच्या प्रवाहात आणण्यासाठी गावोगावी ग्रंथालय चळवळ जोमाने उभी राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.तसेच शासनाच्या अभ्यासिकांप्रमाणे वाचनालयांमध्येही अभ्यासिका सुरू करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

प्रारंभी वाशी येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरापासून बाल वारकरी विद्यार्थ्यांच्या ग्रंथ दिंडीस प्रारंभ झाला. ढोल,हलगी,मृदुंग व टाळांच्या गजरात आणि जनजागृतीपर गीतांच्या निनादात ही दिंडी छत्रपती शिवाजी महाराज चौक,पारा चौक मार्गे कार्यक्रम स्थळी दाखल झाली.विद्यार्थ्यांनी लेझीम,टिपऱ्या, अभंग व इतर सादरीकरणातून वातावरणात चैतन्य निर्माण केले.

ग्रंथोत्सव स्थळी दीपप्रज्वलन करून महामानवांना पुष्पहार अर्पण करण्यात आले आणि धाराशिव ग्रंथोत्सव - २०२५ चे थाटात उद्घाटन झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी हनुमान ढाकणे यांनी केले. सूत्रसंचालन भैरवनाथ कानडे यांनी तर आभार लक्ष्मीकांत पवार यांनी मानले.कार्यक्रमास ग्रंथालय चळवळीतील पदाधिकारी,कार्यकर्ते, विद्यार्थी,शिक्षक,कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**


# जगदंबा मंदिरातून महादेवाच्या पालखीची फटाक्यांची आतषबाजीत स्वागत



लोहारा (प्रतिनिधी)-लोहारा शहरातील महाशिवरात्री यात्रा महोत्सवास रविवारी (दि.१५) मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. यानिमित्त शहरातील जगदंबा मंदिरातून महादेवाच्या पालखीची मान्यवरांच्या हस्ते आरती करून उत्साहात वाजता गाजत फटाक्यांची आतषबाजी करून पालखीची व महादेवाच्या मानाच्या काठ्यांची जंगी मिरवणूक काढण्यात आली. सलग पाच दिवस चालणाऱ्या यात्रा महोत्सवात सांस्कृतिक, क्रीडा, भारूड, कुस्ती यासह विविध भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या यात्रा महोत्सवाची सुरुवात शोभायात्रेने झाली. या वेळी हरिहर भजनी मंडळाचे वारकरी टाळ, मृदंग, हर हर महादेवच्या घोषणा देत पालखी व महादेवाच्या मानाच्या काठ्यांची जगदंबा मंदिर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकमार्गे मिरवणूक काढण्यात आली. या वेळी पालखी व शोभायात्रेचे छत्रपती शिवाजी महाराज चौकात आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी करून या शोभायात्रेचे मान्यवर व ग्रामस्थांच्या हस्ते महादेवाची आरती करण्यात आली. त्यानंतर ही शोभायात्रा जुन्या गावातील प्राचीन महादेव मंदिरापर्यंत काढण्यात आली. दुपारी २ वाजता भारुडाचा जंगी कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी लोहारा येथील चालक व मालक संघटनेच्या वतीने उपस्थित भाविकांना फराळ व महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. महादेव मंदिर येथे सायंकाळी ६ वाजता दीपोत्सव कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी शहरातील युवक, यात्रा कमिटीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, लहान मुले यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

आज काल्याचे कीर्तन, जंगी कुस्त्यांचे मैदान सोमवारी (दि. १६)) सकाळी साडे अकरा वाजता भुजंग महाराज पळसकर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल. दुपारी ४ वाजता भव्य खुल्या जंगी कुस्त्यांचा फड रंगणार आहे. शेवटची कुस्ती विजेत्या मल्लास चांदीची महादेवाची पिंड शिवशंकर जट्टे कुटुंबीयांच्या वतीने देण्यात येणार आहे. उपविजेत्यास लोहारा खुर्द येथील संजय रसाळ यांच्या वतीने ५००० रुपये व स्मृतिचिन्ह देण्यात येणार आहे.

# ज्येष्ठ अर्थतज्ञ प्रा. प्रमोद शहा यांच्या व्याख्यानाचे आयोजन

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ज्येष्ठ अर्थतज्ञ प्रा. प्रमोद शहा यांच्या व्याख्यानाचे आयोजन दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ०९:०० वा.करण्यात आले आहे.

प्रा.प्रमोद शहा हे ज्येष्ठ अर्थतज्ञ असून सुप्रसिद्ध लेखक आहेत.त्यांनी विविध महाविद्यालयात व प्रसार माध्यमावर व्याख्याने दिलेली आहेत. विद्यापीठाच्या अनेक समित्यांवर प्रभावीपणे कार्य केले आहे.अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने त्यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केलेले आहे. याबरोबरच त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित देखील केलेले आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने या ज्वलंत विषयावर ते मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप देशमुख हे असणार आहेत.

## लॉजवर घेवून लैंगीक केला अत्याचार

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत एका गावातील १७ वर्षीय मुलगी हिस गावातील एका तरुणाने त्याचे मोटरसायकलवर फिरायला घेवून जातो असे म्हणून लॉजवर घेवून जावून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. अशा मजकुराच्या पिडीतेची आई यांनी दि.१४.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम-१३७(२), ६४(२) सह पोक्सो कलम ४, ६ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## मोटारसायकलची चोरी

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत प्रदिप कल्याण मुंढे, वडगाव ता. कळंब जि. धाराशिव यांची मोटरसायकल ही दि.१०.०२.२०२६ रोजी राहते घराचे समोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी प्रदिप मुंढे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## कळंब येथून मोटारसायकलची चोरी

कळंब (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत फर्यादी धनंजय बापु मोरे, वय ३१ वर्षे, रा. ईटकुर ता. कळंब जि. धाराशिव यांची अंदाजे ७०,००० किंमतीची टी. व्ही. एस कंपनीची ज्युपीटर मोटरसायकल ही दि.१३.०२.२०२६ रोजी प्रेरणा बार कळंब समोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.


**Name of changeDeclaration**
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **KAZI ISMILE JABIBULLA QUDRATULLA** TO: **ISMAIL JABIULLA KHUDRATUKLA KAZI**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **ISMAIL JABIULLA KHUDRATUKLA KAZI** in future the same will used by my family wife, children and relative.
OLD NAME :- **KAZI ISMILE JABIBULLA QUDRATULLA**
NEW NAME :- **ISMAIL JABIULLA KHUDRATUKLA KAZI**
Address - Kazi Galli Naldurg Taluka Tuljapur DIST. Osmanabad. -413602
Adhar n.-207723252305 Mob.9322019046

**Name of change Declaration**
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **KAZI QUDRATULLA KALIM** TO: **KHUDARATULLA KALIM KAZI**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **KHUDARATULLA KALIM KAZI** in future the same will used by my family wife, children and relative.
OLD NAME :- **KAZI QUDRATULLA KALIM**
NEW NAME :- **KHUDARATULLA KALIM KAZI**
Address - Kazi Galli Naldurg Taluka Tuljapur DIST. Osmanabad. -413602
Adhar n.-331875092214 Mob.9322019046

**Name of change Declaration**
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **KHAZI MOHAMMED ASIF MOHAMMED HABIBULLAH** TO: **MOHAMMED ASIF KAZI**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **MOHAMMED ASIF KAZI** in future the same will used by my family wife, children and relative.
OLD NAME :- **KHAZI MOHAMMED ASIF MOHAMMED HABIBULLAH**
NEW NAME :- **MOHAMMED ASIF KAZI**
Address - Flat No 05 Plot no 64 Vidiyasagar Colony Market Yard Pune DIST. Pune City -411037
Adhar n.-616010247367 Mob.9325757577

**Name of change Declaration**
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **KAZI SHAHABAZ ABULULUM TO: SHAHABAJ A ULUM KAZI**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **SHAHABAJ A ULUM KAZI** in future the same will used by my family wife, children and relative.
OLD NAME :- **KAZI SHAHABAZ ABULULUM**
NEW NAME :- **SHAHABAJ A ULUM KAZI**
Address - Mohammed Panah Galli Nagar Naldurg Taluka Tuljapur DIST. Osmanabad. -413602
Adhar n.-789403128208 Mob.9850760033


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649